# राष्ट्रीय शॉर्ट फिल्म स्पर्धेत नागठाणे कॉलेज प्रथम

**सातारा न्यूज;**

**देशमुखनगर** : कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेजच्या वतीने आयोजित 'विवेकानंद महोत्सव शोध चैतन्याचा -2023' निमित्त संपन्न झालेल्या विविध स्पर्धांमधील राष्ट्रीय मेगा इव्हेंट शॉर्ट फिल्म स्पर्धेत नागठाणेच्या आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी दिग्दर्शन केलेल्या 'दीक्षा' या शॉर्ट फिल्मला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक व रोख पाच हजार रुपये मिळाले. या स्पर्धेमध्ये जय लोरे या विद्यार्थ्याने फिल्मचे दिग्दर्शन केले. तर दीक्षा या पात्राच्या मुख्य भूमिकेमध्ये दीक्षा कुंभार



या विद्यार्थिनीने काम केले. त्याचबरोबर सहकलाकार म्हणून महाविद्यालयाचे विद्यार्थी कोरी पाटी प्रोड्युशनचे कलाकार संदीप जंगम,मंदार कोल्हटकर, पूजा कांदेकर,पूनम मुसळे,प्रिती मोहिते,श्रद्धा यादव,निकिता पवार,जय लोरे,शीतल बिडे, सुजाता सपकाळ, यश गोडसे,राहुल कुंभार,कोरी पाटी टीमचे सदस्य तृप्ती शेडगे,सूरज गायकवाड, कॅमेरामन गणेश शिंदे इत्यादींनीही महत्वपूर्ण काम करून या यशामध्ये मोलाचा वाटा उचलला.

सदर स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.(प्रो). सतीश घाटगे, कोरीपाटी प्रोड्युशनचे डायरेक्टर श्री. नितीन पवार, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.संतोष निलाखे सांस्कृतिक विभागातील सर्व सदस्य व महाविद्यालयातील प्राध्यापक इत्यादींनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा शुभांगीताई गावडे, सहसचिव प्रशासन मा.प्राचार्य राजेंद्र शेजवळ, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य,प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

दैनिक सातारा न्यूज

# सातारा विभागीय शूटिंग बॉल स्पर्धेत नागठाणे कॉलेज प्रथम



सातारा न्यूज;

देशमुखनगर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे येथे सातारा विभागीय शूटिंग बॉल स्पर्धा संपन्न झाल्या. सदर स्पर्धेमध्ये नागठाणे कॉलेजने उत्कृष्ट खेळ करून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. शहाजीराजे महाविद्यालय खटाव, महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक,बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण महाविद्यालयाने तृतीय क्रमांक तर यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज, कराड महाविद्यालयाने उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले.

सदर स्पर्धेच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी बोरगाव पोलीस स्टेशनचे ए.पी.आय. मा.श्री.रवींद्र तेलतुंबडे, प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव, सातारा विभागाच्या क्रीडा सचिव प्रा.स्मिता कुंभार, प्रा.सुखदेव सजगणे प्रा.डॉ. दीपक पाटील प्रा.अमर सावंत क्रीडा विभागप्रमुख प्रा.लक्ष्मण दोडमनी, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री गणेश साळुंखे, पदाधिकारी विक्रम बागल प्रा.रणधीर शिलेवंत,श्री.प्रदीप बर्गे, ग्रामस्थ बाळासाहेब पवार, पंच म्हणून प्रा.बाळासाहेब दबडे व श्री प्रसाद घाडगे इत्यादी उपस्थित होते. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मा. प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जिमखाना विभागप्रमुख प्रा.लक्ष्मण दोडमनी व जिमखाना विभागाचे सदस्य, प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या सौ.शुभांगीताई गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.कौस्तुभ गावडे, सहसचिव प्रशासन मा.प्राचार्य राजेंद्र शेजवळ, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

सकाळ
कोल्हापूर
बुधवार, १९ एप्रिल २०२३

# महोत्सवामुळे विद्यार्थ्यांना व्यासपीठ

## रोहित कोरगावे; 'विवेकानंद'मध्ये महोत्सवाचे उद्‌घाटन

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : "स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे. सध्याचा काळ कौशल्य विकासाचा असून, अशा काळात विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी स्पर्धेत सहभागी होणे महत्त्वाचे आहे. अशा काळात विवेकानंद महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाला आकार देण्यासाठी, त्यांच्या कलागुणांचा विकास होण्यासाठी विवेकानंद महोत्सवाचे केलेले आयोजन महत्त्वाचे आहे," असे प्रतिपादन स्मार्टस ग्लोबल सर्व्हिसेसचे संचालक रोहित कोरगावे यांनी केले. ते विवेकानंद महाविद्यालय आयोजित विवेकानंद महोत्सवाच्या उद्‌घाटनात बोलत होते. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे अध्यक्षस्थानी होते.

प्राचार्य साळुंखे यांनी तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. महोत्सवाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी प्रास्ताविक केले. महोत्सवात फूड फेस्टिव्हलमध्ये वेगवेगळ्या पदार्थांचा खवय्यांनी मनसोक्त आस्वाद घेतला. दोन दिवस चालणाऱ्या या महोत्सवाच्या पहिल्या दिवशी अभिवाचन, स्टार्टअप, नावीन्यपूर्ण संशोधन, शॉर्ट फिल्म मेकिंग, रील ओ ॲड, एकपात्री या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धांमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, केरळमधील बहुसंख्य महाविद्यालये सहभागी झाली होती. उद्‌घाटन समारंभात प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. कविता तिवडे यांनी आभार मानले. या वेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार उपस्थित होते.



कोल्हापूर : विवेकानंद महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी रोहित कोरगावे यांनी मार्गदर्शन केले. या वेळी प्राचार्य अभयकुमार साळुंखे व मान्यवर उपस्थित होते.

### एकपात्री

- प्रथम : निहाल रुकडीकर, विवेकानंद महाविद्यालय
- द्वितीय : पीयूष जमादार, कॉमर्स कॉलेज
- तृतीय : प्रांजल जाधव, वीरमाता जिजाबाई महाविद्यालय, मुंबई

### रील ओ ॲड

- प्रथम : सतेज राऊत, केआयटी महाविद्यालय
- द्वितीय : अजय माने, डी. आर. माने महाविद्यालय, कागल
- तृतीय : गौरव रोकडे, विवेकानंद महाविद्यालय

### स्पर्धा अभिवाचन विजेते

- प्रथम : विवेकानंद महाविद्यालय
- द्वितीय : महावीर महाविद्यालय
- तृतीय : कॉमर्स कॉलेज

### स्टार्टअप स्पर्धा

- प्रथम : अजिंक्य भोसले, योगेश चोपले, राजे रामराव महाविद्यालय, जत
- द्वितीय : ऋतुजा पाटील, स्वरूपा पाटील, न्यू कॉलेज, कोल्हापूर
- तृतीय : श्रीवर्धन शिंदे, विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर

### नावीन्यपूर्ण संशोधन

- प्रथम : वहिदा जमादार, विवेकानंद महाविद्यालय
- द्वितीय : प्रेरणा सावंत, शिवाजी विद्यापीठ
- तृतीय : स्टेला थॉमस, न्यू कॉलेज व श्रीरंगा श्रीकुमार, केरळा विद्यापीठ

### शॉर्ट फिल्म मेकिंग

- प्रथम : कला व वाणिज्य महाविद्यालय, नागठाणे.
- द्वितीय : डी. आर. माने महाविद्यालय, कागल
- तृतीय : विवेकानंद महाविद्यालय

पुढारी



नागठाणे : स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करताना मान्यवर.

# राष्ट्रीय शॉर्ट फिल्म स्पर्धेत नागठाणे कॉलेज प्रथम

**नागठाणे : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेजच्यावतीने आयोजित विवेकानंद महोत्सव शोध चैतन्याचा-२०२३ या कार्यक्रमानिमित्त संपन्न झालेल्या विविध स्पर्धांमधील राष्ट्रीय मेगा इव्हेंट शॉर्ट फिल्म स्पर्धेत नागठाणेच्या आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी दिग्दर्शन केलेल्या 'दीक्षा' या शॉर्ट फिल्मला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

या स्पर्धेमध्ये जय लोरे या विद्यार्थ्याने फिल्मचे दिग्दर्शन केले. तर दीक्षा या पात्राच्या मुख्य भूमिकेमध्ये दीक्षा कुंभार या विद्यार्थिनीने काम केले. त्याचबरोबर सहकलाकार म्हणून महाविद्यालयाचे विद्यार्थी कोरी पाटी प्रोड्युशनचे कलाकार संदीप जंगम, मंदार कोल्हटकर, पूजा कांदेकर, पूनम मुसळे, प्रीती मोहिते, श्रद्धा यादव, निकिता पवार, जय लोरे, शीतल बिडे, सुजाता सपकाळ, यश गोडसे, राहुल कुंभार, तृप्ती शेडगे, सूरज गायकवाड, गणेश शिंदे यांनी या यशामध्ये मोलाचा वाटा उचलला. या स्पर्धेच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सतीश घाटगे, डॉ. अजितकुमार जाधव, कोरीपाटी प्रोड्युशनचे डायरेक्टर नितीन पवार, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. संतोष निलाखे, सांस्कृतिक विभागातील सर्व सदस्य व महाविद्यालयातील प्राध्यापक यांनी मार्गदर्शन केले.

My Satara Edition
Apr 24, 2023 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

यांनी आयोजित आयोजित केली आहे. या स्पर्धेतील साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या बैठकीचे अधिकृत इतिवृत्त राज्य शासनाच्यावतीने गुरुवारी प्रसिद्ध करण्याबाबत खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर दिली आहे.

# स्पर्धा परीक्षेचे तंत्र जाणून उत्कृष्ट करिअर करा : प्रा.बी.एस.खोत

**सातारा न्यूज:**

**देशमुखनगर :** स्पर्धेच्या युगात स्पर्धा परीक्षांचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे नोकरीच्या शोधात असणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांशिवाय नोकरी मिळणे शक्य नाही हे ओळखून त्या दृष्टीने मार्गक्रमण करायला हवे . स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी ध्येय, चिकाटी , मेहनत , नियोजन व सहनशिलता या गुणांबरोबरच सकारात्मक भूमिकाही महत्वाची आहे म्हणून परीक्षार्थींनी स्वत:साठी, समाजासाठी आणि देशासाठी विधायक काम करायचे आहे हा ध्यास घेऊन स्पर्धा परीक्षेचे तंत्र जाणून उत्कृष्ट करिअर करावे असे उद्गार कराड येथील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे संचालक प्रा.बी.एस.खोत यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर



,संचलित आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज,नागठाणे या महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभाग उदघाटन व स्पर्धा परीक्षा तयारी एक तंत्र या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव हे होते. प्रमुख मार्गदर्शक प्रा.खोत सर आपल्या मार्गदर्शनपर भाषणात पुढे म्हणाले की,देशातील सर्व युगपुरुष हे आपले प्रेरणास्थान आहेत. त्यांचा आदर्श ठेवून मार्गक्रमण करा. प्रत्येक ठिकाणी स्पर्धा आहे आणि या स्पर्धांमध्ये मनापासून सहभागी झाल्यास यश मिळतेच. अत्यंत कमी खर्चात सर्वोच्च पदावर जाण्याची सुवर्णसंधी म्हणजे स्पर्धा परीक्षा आहे. अनेक गरीब विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत करून उच्च पदे प्राप्त केली आहेत. म्हणून अभ्यास ज्ञान मिळवण्यासाठी करा आणि स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासक्रमातील विविध संकल्पना मुळापासून आत्मसात करा एक दिवस तुमचा असेल .

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उदघाटक माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय,शाहूनगर शेंद्रे येथील प्राचार्य मा. संजय नलवडे आपल्या उदघाटनपर भाषणात म्हणाले की, स्पर्धा परीक्षा तंत्र ही एक कला आहे. बहुआयामी विद्यार्थी यात करिअर करीत असतो. त्याकरिता कोणतीही पदवी मिळवणे प्रथम आवश्यक आहे. पहिलं पाऊल टाकण्यासाठी प्रयत्न करा अधिकारी होणे अवघड नाही .

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव आपल्या भाषणात म्हणाले की, या महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उदघाटन करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अधिकारी होण्याची संधी प्राप्त करून दिली आहे. विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन, चिंतन व मनन करून स्पर्धा परीक्षेत यश संपादन करावे .

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थित असलेले नागठाणे नगरीचे कृषिभूषण मा.मनोहर साळुंखे (भाऊ) यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत स्पर्धा परीक्षा विभाग केंद्राचे संचालक डॉ. राजाराम कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.स्मिता कालभूषण यांनी केले तर आभार प्रा.जयसिंग राठोड यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी व प्राध्यापक बंधू-भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

---


जनसामान्यांचा बुलंद आवाज

# कर्मयोगी

Karmayogi ▮ मोबा.9326133731 सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर



डॉ.धनंजय खैर (होमिओपॅथी तज्ञ) यांचे

३० वर्षाचा अनुभव असलेले कराडमधील एकमेव

होमिओपॅथी क्लिनीक

ऑपरेशन शिवाय नाकातील वाढलेले हाड, मुतखडा, पिताशयातील खडा, दमा यासारख्या जुनाट आजारावरील उपचारासाठी भेटा.

टिळक हायस्कुल जवळ, कराड मोबा:९३७०३३२४१३



▮कराड (सातारा) वर्ष:२३ ▮अंक:२४७ RNI NO.MAH-MAR/2001/3806 / संपादिका:सौ.मंगल लोखंडे / प्रबंध संपादक:श्री.संजय पवार ▮ रविवार दि.१९ मार्च २०२३ ▮पाने ४ ▮किंमत २ रुपये

▮Karad(Satara) Vol-23 ▮Ishue-247 RNI NO.MAH-MAR/2001/3806 /Editor Mrs.Mangal Lokhande/ ▮Sunday 19 March 2023 ▮ Pages 4 ▮Price 2 Rs.


# स्पर्धा परीक्षेचे तंत्र जाणून उत्कृष्ट करिअर करा:प्रा.बी.एस.खोत

**नागठाणे,दि.१८(प्रतिनिधी)**

स्पर्धेच्या युगात स्पर्धा परीक्षांचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे नोकरीच्या शोधात असणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांशिवाय नोकरी मिळणे शक्य नाही हे ओळखून त्या दृष्टीने मार्गक्रमण करायला हवे. स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी ध्येय, चिकाटी, मेहनत, नियोजन व सहनशीलता या गुणाबरोबरच सकारात्मक भूमिका ही महत्त्वाची आहे म्हणून परीक्षार्थींनी स्वत:साठी, समाजासाठी आणि देशासाठी विधायक काम करायचे आहे हा ध्यास घेऊन स्पर्धा परीक्षेचे तंत्र जाणून उत्कृष्ट करिअर करावे असे उद् गार कराड येथील शिक्षणमहर्षी डॉ . बापूजी साळुंखे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे संचालक प्रा बी एस खोत यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर ,संचलित आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभाग उद्घाटन व स्पर्धा परीक्षा तयारी एक तंत्र या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव हे होते.



प्रमुख मार्गदर्शक प्रा.खोत सर आपल्या मार्गदर्शनपर भाषणात पुढे म्हणाले, देशातील सर्व युगपुरुष हे आपले प्रेरणास्थान आहेत. त्यांचा आदर्श ठेवून मार्गक्रमण करा. प्रत्येक ठिकाणी स्पर्धा आहे आणि या स्पर्धांमध्ये मनापासून सहभागी झाल्यास यश मिळतेच. अत्यंत कमी खर्चात सर्वोच्च पदावर जाण्याची सुवर्णसंधी म्हणजे स्पर्धा परीक्षा आहे. अनेक गरीब विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत करून उंच पदे प्राप्त केली आहेत. म्हणून अभ्यास ज्ञान मिळवण्यासाठी करा आणि स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासक्रमातील विविध संकल्पना मुळापासून आत्मसात करा एक दिवस तुमचा असेल.

स्पर्धा परीक्षेचा मार्गदर्शन केंद्राचे उदघाटक माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय शाहूनगर शेंद्रे येथील प्राचार्य मा संजय नलवडे आपल्या उद्घाटनपर भाषणात म्हणाले , स्पर्धा परीक्षा तंत्र ही एक कला आहे . बहुआयामी विद्यार्थी यात करिअर करीत असतो. त्याकरिता कोणतीही पदवी मिळवणे प्रथम आवश्यक आहे . पहिलं पाऊल टाकण्यासाठी प्रयत्न करा अधिकारी होणे अवघड नाही.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव आपल्या भाषणात म्हणाले, या महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उदघाटन करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अधिकारी होण्याची संधी प्राप्त करून दिली आहे. विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन, चिंतन व मनन करून स्पर्धा परीक्षेत यश संपादन करावे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थित असलेले नागठाणे नगरीचे कृषिभूषण मा मनोहर साळुंखे (भाऊ) यांनीही आपले मनोगत व्यक्त केले .या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत स्पर्धा परीक्षा विभाग केंद्राचे संचालक डॉ.राजाराम कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.स्मिता कालभूषण यांनी केले तर आभार प्रा. जयसिंग राठोड यांनी मानले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी व प्राध्यापक बंधू-भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# स्पर्धेच्या युगात इंग्रजी व्याकरण शिकणे महत्त्वाचे डॉ. प्रशांत लोहार

**सातारा न्यूज;**

**देशमुखनगर :** सध्याचे युग हे स्पर्धेचे असून विद्यार्थ्यांना स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी इंग्रजी व्याकरण शिकणे महत्त्वाचे आहे. असे उद्गार सातारा येथील एल.बी.एस.कॉलेजमधील इंग्रजी विभागाचे सहयोगी प्रा. डॉ.प्रशांत लोहार यांनी नागठाणे च्या कॉमर्स कॉलेजमध्ये इंग्रजी विभाग व सातारा चाप्टर ऑफ इ.एल.टी@आय यांच्या संयुक्त विद्यमाने 4 मार्च राष्ट्रीय ग्रामर दिनानिमित्त आयोजित 'लर्निंग इंग्लिश ग्रामर'या एकदिवसीय कार्यशाळा प्रसंगी काढले. ते पुढे म्हणाले की, इंग्रजी व्याकरणामुळे संवाद कौशल्य सुलभ आणि सोपे होण्यास मदत होते. त्याचबरोबर विविध साध्या-सोप्या क्लृप्त्यांच्या माध्यमातून इंग्रजी ग्रामर सोप्या पद्धतीने कसे शिकता येते हे त्यांनी समजावून सांगितले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव म्हणाले की, इंग्रजी ग्रामर विद्यार्थ्यांना अवघड वाटत असले तरी ते अभ्यास आणि सरावाने सोपे होऊ शकते. इंग्रजी विषयामध्ये शिक्षण पूर्ण केले तर निश्चितच विद्यार्थ्यांना अनेक प्रकारच्या रोजगाराच्या संधी प्राप्त होऊ शकतात. त्यासाठी कठोर परिश्रम घेण्याची व इच्छाशक्तीची गरज आहे.

जनसामान्यांचा बुलंद आवाज

# कर्मयोगी

Karmayogi ▮ मोबा.9326133731 सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर

डॉ.धनंजय खैर (होमिओपॅथी तज्ञ) यांचे
३० वर्षांचा अनुभव असलेले कराडमधील एकमेव
होमिओपॅथी क्लिनीक
ऑपरेशन शिवाय नाकातील वाढलेले हाड, मुतखडा, पिताशयातील खडा, दमा यासारख्या जुनाट आजारावरील उपचारासाठी भेटा.
टिळक हायस्कुल जवळ, कराड मोबा:९३७०३३२४१३

▮कराड (सातारा) वर्ष:२३ ▮अंक:२३६ RNI NO.MAH-MAR/2001/3806 / संपादिका:सौ.मंगल लोखंडे / प्रबंध संपादक:श्री.संजय पवार ▮ रविवार दि.५ मार्च २०२३ ▮पाने ४ ▮किंमत २ रुपये

▮Karad(Satara) Vol-23 ▮ Ishue-236 RNI NO.MAH-MAR/2001/3806 /Editor Mrs.Mangal Lokhande/ ▮Sunday 5 March 2023 ▮ Pages 4 ▮Price 2 Rs.

# महाराष्ट्राच्या जडणघडणीत लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे कार्य महत्त्वपूर्ण:डॉ.विलास पोवार

**नागठाणे,दि.४(प्रतिनिधी)**

शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, कृषी, क्रीडा आणि साहित्य इत्यादी क्षेत्रांमध्ये कार्य करून लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

असे उद्गार कोल्हापूर येथील डी.डी. सरकार महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.विलास पोवार यांनी नागठाणेच्या आर्टस् ण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये इतिहास विभाग आणि लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन केंद्र शिवाजी विद्यापीठ, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महाराष्ट्राचे शिल्पकार: लोकनेते बाळासाहेब देसाई' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेप्रसंगी काढले.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्रातील विविध शिक्षण संस्था व शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेमध्ये त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यांनी भूकंपग्रस्तांसाठी कार्य, साखर कारखान्यांची स्थापना, कसेल त्याची जमीन व कुळ कायदा लागू करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या राजकीय कारकिर्दीमध्ये महसूल पाटबंधारे गृह शिक्षण व कृषी ही महत्त्वाची पदे सांभाळून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासामध्ये मोलाचा वाटा उचलला आहे.



कार्यक्रमाचे अध्यक्ष मरळी (ता.पाटण) येथील लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक प्रा.विश्वनाथ पानसकर म्हणाले की, बाळासाहेब देसाई हे महाराष्ट्राच्या सर्वांगीण क्षेत्रामधील बहुआयामी व्यक्तिमत्व होते. त्यांच्या कार्याने आज ते अजरामर आहेत.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून उपस्थित असलेले लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन केंद्र शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे समन्वयक डॉ.अविनाश पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांनी विविध थोर पुरुष व समाजसुधारकांची चरित्र वाचून त्यांच्या कार्याची प्रेरणा घेतली पाहिजे.

याप्रसंगी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील इतिहास विभागाचे सहा. प्राध्यापक डॉ.दत्तात्रय मचाले हेही उपस्थित होते.

याप्रसंगी 'ऐतिहासिक प्राचीन मंदिरे' या तरंग भित्तिपत्रिकेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्र प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव म्हणाले की, आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत बाळासाहेब देसाई यांचे बहुमोल योगदान राहीले आहे. त्यागावर उभा राहिलेल्या आपल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक, संकल्पक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनीही शिक्षण प्रसाराचे बहुमोल कार्य करून बहुजन समाजाला ज्ञानाची कवाडे उघडून दिली आहेत.

प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा.जे.आर.राठोड यांनी आभार प्रा.राहुल गंगावणे यांनी तर सूत्रसंचालन प्रा.स्मिता कालभूषण यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी- विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

शब्दकोडे क्र.२३०

आडवे शब्द

जनसामान्यांचा बुलंद आवाज

# कर्मयोगी

Karmayogi ▮ मोबा.9326133731 सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर

डॉ.धनंजय खैर (होमिओपॅथी तज्ञ) यांचे

होमिओपॅथी क्लिनीक

RNI NO.MAH-MAR/2001/3806

▮Karad(Satara) Vol-23 ▮ Ishue-232 RNI NO.MAH-MAR/2001/3806 / Editor Mrs.Mangal Lokhande / ▮Wednesday 1 March 2023 ▮ Pages 4 ▮Price 2 Rs.



# मराठी भाषेचे जतन, संवर्धन करणे ही काळाची गरज:डॉ. भरत जाधव



**नागठाणे,दि.२८(प्रतिनिधी)**
'महाराष्ट्रातील विविध बोलीभाषांनी मराठी भाषेला समृद्ध केले आहे. या मराठी भाषेचा समृद्ध असा वारसा पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी आजच्या पिढीची आहे.तसेच मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करणे ही

पाहिजे. शुद्ध मराठीसाठी भाषाशुद्धी चळवळ राबवावी लागेल जोपर्यंत मराठी भाषा ज्ञानभाषा होत नाही, तोपर्यंत तिच्यासमोर आव्हाने उभी असणार आहेत. महाराष्ट्रातील नागरिकांनी अन्य भाषेपेक्षा मराठी भाषेचा आग्रह धरला पाहिजे.
कार्यक्रमाचे अध्यक्ष

# महिलांनी शारीरिक आणि मानसिकारक आरोग्याचे व्यवस्थापन करणे काळाची गरज - डॉ.राहुल आनंदे

**सातारा न्यूज;**
**देशमुखनगर** : महिलांनी दैनंदिन कामकाजामधून वेळ काढून सकस आहार, योगा व प्राणायाम करुन शारीरिक आणि मानसिक आरोग्य व्यवस्थापन करणे काळाची गरज बनली आहे. असे उद्गार नागठाणे मधील डॉ.राहुल आनंदे यांनी

यांनी नागठाणेच्या आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये अग्रणी महाविद्यालय योजना अंतर्गत तक्रार निवारण समिती विभागाच्या वतीने 'महिलांचा आहार आणि आरोग्य' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेप्रसंगी काढले.

ते पुढे म्हणाले की, धावपळीच्या युगामध्ये महिला कुटुंबाबरोबर नोकरी व्यवसाय करून दुहेरी जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांनी स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

याप्रसंगी आरोग्यसेविका रूपाली पवार आपल्या मनोगतमध्ये म्हणाल्या की, किशोरवयीन मुलींमध्ये शारीरिक आणि मानसिक बदल होत असतात. त्यामुळे त्यांनी शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे.

कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव म्हणाले की, महिलांनी दुहेरी जबाबदारी वाढत असताना विविध क्षेत्रांमध्ये उतुंग यश मिळवून प्रगती करत स्वत:ला सिद्ध केले आहे.

याप्रसंगी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पी.एच.सी सेंटर मधील आरोग्य सेविका श्रीमती.के.डी.रेंगडे, रूपाली पवार, योगिता शेळके, आर.एन. घोरपडे, एस.व्ही.मालुसरे, एस.के.शेख, जयश्री निकम यांचा कोरोना योद्धा म्हणून सन्मानपत्र देऊन तर महाविद्यालयात कार्यरत असलेल्या प्राध्यापिकांचा बुके देऊन महिला दिनानिमित्त गौरव करण्यात आला.

प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीच्या प्रमुख प्रा.जयमाला उथळे यांनी आभार अग्रणी योजना विभाग प्रमुख प्रा. संतोष निलाखे यांनी तर सूत्रसंचालन शितल सालवाडगी यांनी केले.

13-02-2023-3
13 Feb 2023

दैनिक
एकमेव विचारपत्र
# महाराष्ट्र न्यूज

https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# नागठाणे कॉलेजचे विविध स्पर्धा प्रकारात घवघवीत यश



**महाराष्ट्र न्यूज नेटवर्क**
**नागठाणे, दि. १२ फेब्रुवारी:** सातारा येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे माध्यमिक विद्यालय, सातारा येथे पार पडलेल्या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे विभागीय स्पर्धेमध्ये नागठाणेच्या आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेजने वक्तृत्व आणि निबंध या स्पर्धा प्रकारांमध्ये घवघवीत यश संपादन केले. महाविद्यालयीन गटात वक्तृत्व स्पर्धेमध्ये कु.श्रेया देशमुख हिने सायबर गुन्हे नवे युग नवी समस्या या विषयावर सर्वोत्कृष्ट सादरीकरण करुन प्रथम क्रमांक पटकावला.तसेच कु.आदित्य विजय घोरपडे हिला

शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे: एक शैक्षणिक विचारधारा या विषयावरील निबंधास प्रथम क्रमांकाचे तर कु. साक्षी आनंद भोसले हिला श्री स्वामी विवेकानंद : एक कल्पवृक्ष या निबंधास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. गुरुदेव कार्यकर्ते गटामध्ये प्रा.जयसिंग राठोड यांना आजचे समाज वास्तव आणि प्रसारमाध्यमांची भूमिका या निबंधास स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. याप्रसंगी सर्व यशस्वी स्पर्धकांचे महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव तसेच मार्गदर्शक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.संतोष निलाखे व त्यांचे सर्व सदस्य सहकारी प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी अभिनंदन केले.

दैनिक महाराष्ट्र न्यूज

# प्रा. संदीप लोखंडे यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**नागठाणे दि. ३० (प्रतिनिधी)** - नागठाणे, (ता. सातारा) येथील आर्टस अँड कॉमर्स कॉलेजचे



वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. संदीप लोखंडे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखेतून पीएच. डी पदवी प्राप्त केली. प्रा. संदीप लोखंडे यांनी पी. एच डी. साठी घेतलेल्या विषयाचे प्रबंध संशोधन प्रा. डॉ. पदमावती इंगोले यांच्या मार्गदर्शना खाली प्रा. रामकृष्ण मोरे कॉलेज येथील संशोधन केंद्रातून पूर्ण केले. प्रा. लोखंडे हे सध्या शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सातारा शहर आणि ग्रामीण विभागीय समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. वाणिज्य शाखेतील विविध विषयावर त्यांचे एकूण १२ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. त्यांनी विविध विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्याने दिली आहेत. त्यांचे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरील जर्नल्स मधून शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत.

पी. एच. डी पदवी मिळविल्याबद्दल त्यांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थांचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगिताई गावडे, प्रशासन सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ, अर्थ सहसचिव प्राचार्य एस. एम. गवळी, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

प्रभात
Satara, 31 Jan 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

# महिलांनी आरोग्याची काळजी घ्यावी : डॉ. राहुल आनंदे

**नागठाणे : पुढारी वृत्तसेवा**

महिलांनी दैनंदिन कामकाजामधून वेळ काढून सकस आहार, योगा व प्राणायाम करून शारीरिक आणि मानसिक आरोग्य व्यवस्थापन करणे काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन व्याख्याते डॉ. राहुल आनंदे यांनी केले.

नागठाणे, ता. सातारा येथील आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये आयोजित 'महिलांचा आहार आणि आरोग्य' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव होते.

डॉ. राहुल आनंदे म्हणाले, धावपळीच्या युगामध्ये महिला कुटुंबाबरोबर नोकरी, व्यवसाय करून दुहेरी जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव यांनी महिलांनी विविध क्षेत्रांमध्ये यश मिळवून प्रगती करत स्वतःला सिद्ध केले असल्याचे सांगितले. आरोग्य सेविका के. डी. रेंगडे, रूपाली पवार, योगिता शेळके, आर. एन. घोरपडे, एस. व्ही. मालुसरे, एस. के. शेख, जयश्री निकम यांचा सन्मान केला. यावेळी प्रा. संतोष निलाखे, शितल सालवाडगी, प्रा. स्मिता कालभूषण, प्रा. शैला चोबे, प्रा. देशमुख, प्रा. आगवणे, शोभा कुंभार उपस्थित होते. प्रा. जयमाला उथळे यांनी आभार मानले.



नागठाणे : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. राहुल आनंदे. व्यासपीठावर डॉ. अजितकुमार जाधव व इतर.

a Edition
3 Page No. 2
udhari.co.in

जनसामान्यांचा बुलंद आवाज
कर्मयोगी
Karmayogi
मोबा.9326133731 सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर

डॉ.धनंजय खैर (होमिओपॅथी तज्ञ) यांचे
३० वर्षाचा अनुभव असलेले कराडमधील एकमेव
होमिओपॅथी क्लिनीक
ऑपरेशन शिवाय नाकातील वाढलेले हाड, मुतखडा, पिताशयातील खडा, दमा यासारख्या जुनाट आजारावरील उपचारासाठी भेटा.
टिळक हायस्कुल जवळ, कराड मोबा:९३७०३३२४१३

कराड (सातारा) वर्ष:२३ अंक:२१६ RNI NO.MAH-MAR/2001/3806 / संपादिका:सौ.मंगल लोखंडे / प्रबंध संपादक:श्री.संजय पवार शुक्रवार दि.१० फेब्रुवारी २०२३ पाने ४ किंमत २ रूपये
Karad(Satara) Vol-23 Ishue-216 RNI NO.MAH-MAR/2001/3806 / Editor Mrs.Mangal Lokhande / Friday 10 February 2023 Pages 4 Price 2 Rs.

# नागठाणे कॉलेजचा प्रथमेश पिसाळ संगीत वाद्य स्पर्धेत द्वितीय

**नागठाणे, दि.९ (प्रतिनिधी)**

सातारा येथे श्रीनिवास पाटील फाउंडेशन युवा ३६०ओ व सनबीम शिक्षण समुह आयोजित युवोत्सव सातारा येथे पार पडलेल्या सातारा जिल्हा अंतर महाविद्यालयीन संगीत वाद्य स्पर्धा प्रकारामध्ये नागठाणेच्या आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेजमधील विद्यार्थी प्रथमेश अशोक पिसाळ यांने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.



सदर स्पर्धा प्रकारामध्ये ५० विद्यार्थी सहभागी झाले होते. या सर्व विद्यार्थ्यांबरोबर स्पर्धा करून त्यांनी अंतिम फेरी गाठली. सदर अंतिम फेरीमध्ये संगीत वाद्याचे सर्वोत्कृष्ट सादरीकरण करून घवघवीत यश मिळविले. या स्पर्धेमध्ये त्याला रोहित शिंदेयाची हार्मोनियमची साथ मिळाली.

याप्रसंगी प्रथमेश पिसाळ यांने द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव तसेच मार्गदर्शक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.संतोष निलाखे व त्यांचे सर्व सदस्य सहकारी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी अभिनंदन केले.

पुढारी

# महाविद्यालयांच्या श्रमसंस्कार शिबिरातून युवकांमध्ये मानवी मूल्यांची वृद्धी : तेलतुंबडे

**नागठाणे : पुढारी वृत्तसेवा**

विशेष श्रमसंस्कार शिबिरातून विद्यार्थी परिपूर्ण घडतो आणि हे संस्कार विद्यार्थ्यांना त्याच्या भावी जीवनामध्ये अत्यंत उपयोगी पडतात. श्रमसंस्कार शिबिरातून युवकांच्यात मानवी मुल्यांची वृद्धी होते, असे प्रतिपादन सपोनि रवींद्र तेलतुंबडे यांनी केले.

आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज नागठाणेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर आसनगाव (ता. सातारा) येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव हे होते.



**मार्गदर्शन करताना रवींद्र तेलतुंबडे, व्यासपीठावर मान्यवर.**

डॉ. अजितकुमार जाधव म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक सेवेची मूल्ये आणि सामाजिक भान ठेवून समाजसेवेसाठी तत्पर असतो. आपले उज्ज्वल भविष्य घडवत असताना समाज व राष्ट्राला श्रमसंस्काराचे दान करायला शिकवणारी ही योजना समाजाप्रती जबाबदारीने कार्य करणारा युवक निर्माण करते.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी संचालक प्रा. अभय जायभाये यांनी प्रास्ताविक केले.

सूत्रसंचालन प्रा. जयमाला उथळे यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. गणेश गभाले यांनी मांडले. यावेळी सरपंच विनोद गायकवाड, शंकर पवार, प्रा. संदिप लोखंडे आदी उपस्थित होते.

My Satara Edition
Feb 17, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# नागठाणे कॉलेजमध्ये श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहाचे आयोजन

**सातारा न्यूज;**

**देशमुखनगर :** नागठाणेच्या आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये सांस्कृतिक विभाग व जिमखाना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.12 जानेवारी 2023 ते 19 जानेवारी 2022 या कालावधीत श्री स्वामी विवेकानंद जयंती समाहाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव यांनी दिली. समाहाचे उद्घाटन प्रतिमापूजन आणि प्रभात फेरीने होणार असून दुसऱ्या दिवशी शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय कराडचे माजी इतिहास विभाग प्रमुख प्रा.ए.जी.थोरात हे 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे : जीवन व कार्य' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.समाहामध्ये

रांगोळी, निबंध, चित्रकला, वक्तृत्व इत्यादी स्पर्धांबरोबरच क्रीडा विभागाच्या वतीने सांघिक व वैयक्तिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या जन्मदिनानिमित्त ज्ञान शिदोरी दिन- ग्रंथदान



व ग्रंथप्रदर्शन कार्यक्रम, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रक्तदान शिबिर, ज्येष्ठ नागरिक चालणे स्पर्धा इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर समाहाच्या विविध स्पर्धा व उपक्रमांच्या उद्घाटन प्रसंगी अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री.यशवंत हरी साळुंखे,नागठाणे गावच्या सरपंच सौ.रूपाली बेंद्रे, उपसरपंच श्री.अनिल साळुंखे, श्री.संजय साळुंखे, श्री.सचिन साळुंखे, श्री.मारुती जेधे, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री.गणेश साळुंखे व पदाधिकारी तसेच पंचक्रोशीतील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. समाहाच्या समारोप कार्यक्रमाप्रसंगी रामकृष्ण विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेजचे प्रा.विवेक पाटणे हे 'युवकांचे प्रेरणास्थान : स्वामी विवेकानंद' विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून कृषीभूषण मा.श्री.मनोहर (भाऊ) साळुंखे, नागठाणे भाग पत्रकार संघाचे अध्यक्ष मा.श्री.विकास जाधव हेही उपस्थित राहणार आहेत.

याप्रसंगी समाह मधील विविध स्पर्धांमधील विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात येणार आहे.

सदर समाहामध्ये विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव यांनी केले आहे.

पुढारी



सातारा : प्रथमेश पिसाळ याचा सत्कार करताना दै. पुढारीचे न्यूज ब्युरो चिफ हरिष पाटणे व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# प्रथमेश पिसाळ संगीत वाद्य स्पर्धेत द्वितीय

**नागठाणे : पुढारी वृत्तसेवा**

सातारा येथे श्रीनिवास पाटील फाउंडेशन युवा ३६० व सनबीम शिक्षण समूह यांच्या वतीने सातारा येथे पार पडलेल्या सातारा जिल्हा अंतर महाविद्यालयीन संगीत वाद्य स्पर्धा प्रकारामध्ये नागठाणेच्या आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेजमधील विद्यार्थी प्रथमेश अशोक पिसाळ याने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

सदर स्पर्धा प्रकारामध्ये ५० विद्यार्थी सहभागी झाले होते. या सर्व विद्यार्थ्यांबरोबर स्पर्धा करुन त्यांनी अंतिम फेरी गाठली. सदर अंतिम फेरीमध्ये संगीत वाद्याचे सर्वोत्कृष्ट सादरीकरण करून घवघवीत यश मिळविले. या स्पर्धेमध्ये त्याला रोहित शिंदे याची हार्मोनियमची साथ मिळाली. याप्रसंगी प्रथमेश पिसाळ यांने द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव तसेच मार्गदर्शक सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.संतोष निलाखे व त्यांचे सर्व सदस्य, गवळी, उबाळे, प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी अभिनंदन केले. प्रथमेश यास आकाशवाणी कलाकार तबला मास्टर सुनिल राजे तसेच शाळेतील शिक्षकांनी मार्गदर्शन केले. प्रथमेशचे बोरगाव ग्रामस्थांनी तसेच सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.

My Satara Edition
Feb 14, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

जनसामान्यांचा बुलंद आवाज
# कर्मयोगी
Karmayogi
मोबा.9326133731 सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर

डॉ. धनंजय खैर (होमिओपॅथी तज्ञ) यांचे
३० वर्षांचा अनुभव असलेले कराडमधील एकमेव
होमिओपॅथी क्लिनीक
ऑपरेशन शिवाय नाकातील वाढलेले हाड, मुतखडा, पित्ताशयातील खडा, दमा यासारख्या जुनाट आजारावरील उपचारासाठी भेटा.
टिळक हायस्कुल जवळ, कराड मोबा:९३७०३३२४१३

कराड (सातारा) वर्ष:२३ | अंक:२४५ RNI NO.MAH-MAR/2001/3806 | संपादिका:सौ.मंगल लोखंडे | प्रबंध संपादक:श्री.संजय पवार | शुक्रवार दि.१७ मार्च २०२३ | पाने ४ | किंमत २ रुपये
Karad(Satara) Vol-23 | Ishue-245 RNI NO.MAH-MAR/2001/3806 | Editor Mrs.Mangal Lokhande | Friday 17 March 2023 | Pages 4 | Price 2 Rs.

# महिलांनी शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे व्यवस्थापन करणे काळाची गरज:डॉ.राहुल आनंदे




**नागठाणे,दि.१६(प्रतिनिधी)** महिलांनी दैनंदिन कामकाजामधून वेळ काढून सकस आहार, योगा व प्राणायाम करुन शारीरिक आणि मानसिक आरोग्य व्यवस्थापन करणे काळाची गरज बनली आहे. असे उद्‌गार नागठाणे मधील डॉ.राहुल आनंदे यांनी यांनी नागठाणेच्या आर्टस् ण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये अग्रणी महाविद्यालय योजना अंतर्गत तक्रार निवारण समिती विभागाच्या वतीने 'महिलांचा आहार आणि आरोग्य' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेप्रसंगी काढले.

ते पुढे म्हणाले की, धावपळीच्या युगामध्ये महिला कुटुंबाबरोबर नोकरी व्यवसाय करून दुहेरी जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. याप्रसंगी आरोग्यसेविका रूपाली पवार आपल्या मनोगतमध्ये म्हणाल्या की, किशोरवयीन मुलींमध्ये शारीरिक आणि मानसिक बदल होत असतात. त्यामुळे त्यांनी शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे.

कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव म्हणाले की, महिलांनी दुहेरी जबाबदारी वाढत असताना विविध क्षेत्रांमध्ये उत्तुंग यश मिळवून प्रगती करत स्वतःला सिद्ध केले आहे.

याप्रसंगी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पी.एच.सी सेंटर मधील आरोग्य सेविका श्रीमती.के.डी.रेंगडे, रूपाली पवार, योगिता शेळके, आर.एन. घोरपडे, एस.व्ही.मालुसरे, एस.के.शेख, जयश्री निकम यांचा कोरोना योद्धा म्हणून सन्मानपत्र देऊन तर महाविद्यालयात कार्यरत असलेल्या प्राध्यापिकांचा बुके देऊन महिला दिनानिमित्त गौरव करण्यात आला.

प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीच्या प्रमुख प्रा.जयमाला उथळे यांनी आभार अग्रणी योजना विभाग प्रमुख प्रा.संतोष निलाखे यांनी तर सूत्रसंचालन शितल सालवाडगी यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा.स्मिता कालभूषण, प्रा.शैला चोबे, प्रा. देशमुख, प्रा.आगावणे, सौ.शोभा कुंभार महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी- विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब भारताच्या आर्थिक समस्यांचे एक प्रज्ञावंत भाष्यकार : प्राचार्य डॉ.जे.एस.पाटील

सातारा न्यूज;

देशमुखनगर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या समाजाला विकासाचा मार्ग दाखवला. आपल्या बौद्धिक सामर्थ्याच्या साह्याने प्रत्येक मानवाला स्वातंत्र्य, समता व न्याय व्यवस्थेवर आधारित मानवी हक्क बहाल करणाऱ्या भारतीय संविधानाची निर्मिती केली . त्याबरोबरच त्यांनी अर्थशास्त्राच्या विविध विषयाशी निगडित अनेक ग्रंथ लिहिले. ब्रिटिश राजवटीतील भारताची आर्थिक स्थिती, चलन व्यवस्था, केंद्र व राज्य वित्तीय संबंध इत्यादी प्रश्नाबाबत त्यांनी महत्त्वपूर्ण विचार मांडले, ते भारताच्या आर्थिक समस्यांचे एक प्रज्ञावंत भाष्यकार होते असे उद्गार मा प्राचार्य डॉ.जे.एस.पाटील माजी अधिष्ठाता, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर यांनी काढले.




श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानपर कार्यक्रमात " भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर: दृष्टे अर्थशास्त्रज्ञ" या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव हे होते .

प्राचार्य डॉ जे एस पाटील आपल्या भाषणात पुढे म्हणाले, डॉ. बाबासाहेबांनी शेती किफायतशीर होण्यासाठी सामुदायिक शेतीची संकल्पना मांडली, शेती आधारित उद्योगांची उभारणी, चलनाला स्थैर्य प्राप्त होण्यासाठी सुवर्ण परिमाण पद्धतीचा अवलंब , विषमता कमी करण्यासाठी गरिबावर कमी तर श्रीमंतावर जादा कर आकारणी, विकासनितीमध्ये गरिबी हटाव, विषमता निर्मूलन आणि शोषणमुक्त समाज या घटकावर भर दिला पाहिजे असे आर्थिक विचार त्यांनी मांडले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले , प्राचीन काळापासून ते आजपर्यंत जे अनेक युगपुरुष या देशात होऊन गेले. त्यांनी आपल्या कार्याने या देशाला समृद्ध केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशात अनेक सुधारणा घडवून आणण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले . महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्यांच्या ग्रंथाचा व आत्मचरित्राचा अभ्यास करून आपले व्यक्तिमत्व घडवावे.

या कार्यक्रमात प्रमुख उपस्थित कृषिभूषण मा.मनोहर साळुंखे (भाऊ) सदस्य, महाविद्यालय विकास समिती व श्री गणेश साळुंखे अध्यक्ष, माजी विद्यार्थी संघ यांनीही आपले मनोगत व्यक्त केले .

या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या स्टाफसाठी बांधण्यात आलेल्या स्त्री व पुरुष प्रसाधनगृहाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते करण्यात आले . त्याचबरोबर अर्थशास्त्र विभागाच्या वतीने केंद्रीय अर्थसंकल्प 2023 -24 या विषयावरील पोस्टरचे उद्घाटन व वृक्षारोपण प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.राजाराम कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.जयमाला उथळे यांनी केले तर आभार प्रा. रणधीर शिलेवंत यांनी मांडले . या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक बंधू-भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.


जनसामान्यांचा बुलंद आवाज

# कर्मयोगी

Karmayogi ▮ मोबा.9326133731 सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर



डॉ.धनंजय खैर (होमिओपॅथी तज्ञ) यांचे

३० वर्षांचा अनुभव असलेले कराडमधील एकमेव

होमिओपॅथी क्लिनीक

ऑपरेशन शिवाय नाकातील वाढलेले हाड, मुतखडा, पिताशयातील खडा, दमा यासारख्या जुनाट आजारावरील उपचारासाठी भेटा.

टिळक हायस्कुल जवळ, कराड मोबा:९३७०३३२४१३



▮कराड (सातारा) वर्षः२३ ▮अंकः२११ RNI NO.MAH-MAR/2001/3806 / संपादिकाःसौ.मंगल लोखंडे / प्रबंध संपादकःश्री.संजय पवार ▮ शनिवार दि.४ फेब्रुवारी २०२३ ▮पाने ४ ▮किंमत २ रुपये

▮Karad(Satara) Vol-23 ▮Ishue-211 RNI NO.MAH-MAR/2001/3806 /Editor Mrs.Mangal Lokhande/ ▮Saturday 4 February 2023 ▮ Pages 4 ▮Price 2 Rs.




# श्रमसंस्कार शिबीरातून युवकांच्यात मानवी मूल्यांची वृद्धी:रवींद्र तेलतुंबडे




**नागठाणे,दि.३(प्रतिनिधी)**

सुदृढ आरोग्यदायी पिढी ही देशाचे भवितव्य आहे. तरुणांनी मोबाईलचा अतिवापर न करता किंवा कोणत्याही वाईट प्रवृत्तीला बळी न पडता राष्ट्रीय सेवा योजना योजनेमध्ये सहभागी होऊन आपले व्यक्तिमत्व घडवणे आवश्यक आहे . विशेष श्रमसंस्कार शिबिरातून विद्यार्थी परिपूर्ण घडतो आणि हे संस्कार विद्यार्थ्यांना त्याच्या भावी जीवनामध्ये अत्यंत उपयोगी पडतात. श्रमसंस्कार शिबिरातून युवकांच्यात मानवी मूल्यांची वृद्धी होते असे उद्गार रवींद्र तेलतुंबडे सहाय्यक पोलीस निरीक्षक, बोरगाव यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, संचलित आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज , नागठाणे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे आसनगाव ता जि .सातारा येथे आयोजित करण्यात आले आहे. या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव हे होते.

रवींद्र तेलतुंबडे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात पुढे म्हणाले, समाजातील महत्त्वाचा दुवा म्हणून आज युवकांच्याकडे पाहिले जाते. एकविसाव्या शतकातील या तरुणांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना शिक्षणाबरोबरच मूल्यशिक्षण व संस्कार आत्मसात करणे आवश्यक आहे . त्यामुळेच आपल्या मनात समाजाविषयी आदरभाव वाढतो आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो म्हणून युवकांनी उत्स्फूर्तपणे राष्ट्रीय सेवा योजना शिबीरात सहभागी होणे आवश्यक आहे.

या शिबीर उद्घाटनपर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव आपल्या भाषणात म्हणाले ' राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक सेवेची मूल्ये आणि सामाजिक भान ठेवून समाजसेवेसाठी तत्पर असतो. आपले उज्वल भविष्य घडवत असताना समाज व राष्ट्राला श्रमसंस्काराचे दान करायला शिकवणारी ही योजना समाजाप्रती जबाबदारीने कार्य करणारा युवक निर्माण करते. त्याचबरोबर ग्रामीण भागातील रूढी परंपरा आजच्या तरुणांना अवगत करण्यास मदत करते.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर , राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी संचालक प्रा.अभय जायभाये आपल्या प्रास्ताविकात म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांच्या स्वयंशिस्त, समाजसेवा व लोकशाही मूल्याचे शिक्षण रुजवण्याचे काम केले जाते. श्रमसंस्कार शिबिरातून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षम युवाशक्ती व ऊर्जा स्रोत पुरवण्याचे काम करते. आज ग्रामीण भाग विकासाच्या प्रवाहात आणणे हेच आजच्या युवकांचे महत्वाचे कर्तव्य आहे. स्वतःला आणि समाजाला परिपूर्ण बनवण्यासाठी श्रमसंस्कार शिबीर हे महत्त्वाचे व्यासपीठ आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा जयमाला उथळे यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ गणेश गभाले यांनी मांडले. त्यावेळी विनोद गायकवाड सरपंच आसनगाव, शंकर पवार उपसरपंच, प्रा.संदिप लोखंडे, सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ आसनगाव तसेच सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी स्वयंसेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

जनसामान्यांचा बुलंद आवाज
कर्मयोगी
Karmayogi
मोबा.9326133731 सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर

डॉ.धनंजय खैर (होमिओपंथी तज्ञ) यांचे
३० वर्षांचा अनुभव असलेले कराडमधील एकमेव
होमिओपॅथी क्लिनीक
ऑपरेशन शिवाय नाकातील वाढलेले हाड, मुतखडा, पिताशयातील खडा, दमा यासारख्या जुनाट आजारावरील उपचारासाठी भेटा.
टिळक हायस्कूल जवळ, कराड मोबा:९२७०३३२४१३

कराड (सातारा) वर्ष:२३ अंक:२०९ RNI NO.MAH-MAR/2001/3806 / संपादिका:सौ.मंगल लोखंडे / प्रबंध संपादक:श्री.संजय पवार गुरुवार दि.२ फेब्रुवारी २०२३ पाने ४ किंमत २ रुपये
Karad(Satara) Vol-23 Ishue-209 RNI NO.MAH-MAR/2001/3806 / Editor Mrs.Mangal Lokhande / Thursday 2 February 2023 Pages 4 Price 2 Rs.

# आसनगाव येथे नागठाणे कॉलेजचे आजपासून विशेष श्रमसंस्कार शिबीर

**नागठाणे, दि.१ (प्रतिनिधी)** मौजे आसनगाव (ता.जि.सातारा) येथे आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२ फेब्रुवारी, २०२३ ते ८ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीमध्ये विशेष श्रम संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव यांनी दिली.

या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन बोरगाव येथील सहा.पोलीस निरीक्षक रवींद्र तेलतुंबडे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

सदर शिबिरामध्ये 'आरोग्याचा मूलमंत्र :ग्रामविकास' या विषयावर डॉ. राजाराम कांबळे, 'कास पठार जागतिक वारसा संवर्धन'–डॉ.शेखर मोहिते, 'राष्ट्रीय सेवा योजना आणि युवक'– प्रा.अभय जायभाये, 'युवकांपुढील आव्हाने' –मा.राहुल कोळी, 'महिलांचे आरोग्य'– डॉ.सौ. रुपाली बेंद्रे, 'आधुनिक शेतीचे तंत्र'– कृषिभूषण मनोहर साळुंखे, 'प्रबोधनात्मक किर्तन'– ह.भ.प.अक्षय महाराज कडवेकर इत्यादी विषयावर व्याख्याने तसेच ग्रामस्वच्छता, स्मशानभूमी सुशोभीकरण, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यक्तिमत्व विकास, रस्ते दुरुस्ती, पशु लसीकरण, नेत्र तपासणी, हळदीकुंकू समारंभ व महिला मेळावा, रक्तदान शिबिर, शेतकरी मेळावा, योगासने व प्राणायाम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी समाजपयोगी विविध प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. याप्रसंगी माजी सरपंच मनोज गायकवाड, गजानन गायकवाड, सरपंच विनोद गायकवाड, उपसरपंच शंकर पवार इत्यादी मान्यवर शिबिरास उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहेत. तसेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरचे पदाधिकारी शिबिरास सदिच्छा भेट देणार आहेत.

सदर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रीय सेवा योजना विभाग कोल्हापूरचे माजी संचालक प्रा.अभय जायभाये, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.संदीप लोखंडे व डॉ.गणेश गभाले तसेच सदस्य यांच्या सहकार्याने संपन्न होत आहे.

22-02-2023 page 4
22 Feb 2023

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज

https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# नागठाणे कॉलेज राज्यस्तरीय पोवाडा स्पर्धेमध्ये तृतीय

**महाराष्ट्र न्यूज नेटवर्क**

**सातारा , दि. २१ फेब्रुवारी :** छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे शिवजयंती महोत्सवानिमित्त इतिहास विभागाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय पोवाडा स्पर्धेमध्ये नागठाणेच्या आर्टस् ण्ड कॉमर्स कॉलेजने तृतीय क्रमांक पटकावला.



सदर पोवाडा स्पर्धेमध्ये यश गोडसे, सहकलाकार कु. संध्या पवार, कु. अक्षदा जाधव, कु. ऋतुजा काळेकर, कु. ऋतुजा पाटील, कु. प्रथमेश पिसाळ कु.रोहित शिंदे या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रतापगडचे युद्ध या पोवाड्यास तृतीय क्रमांकाचे ट्रॉफी व रोख तीन हजार रुपयाचे पारितोषिक मिळाले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.संतोष निलाखे व त्यांचे सर्व सदस्य यांनी स्पर्धेची तयारी केली.

सदर यशस्वी स्पर्धकांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगीताई गावडे, सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ.राजेंद्र शेजवळ प्र. प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव, सहकारी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी अभिनंदन केले.

दैनिक महाराष्ट्र न्यूज

सकाळ

# स्वामी विवेकानंदांमुळे युवकांची ऊर्जा जागृत

## प्रा. विवेक पाटणे; नागठाणेतील महाविद्यालयात सप्ताहाची सांगता

**काशीळ, ता. २० :** स्वामी विवेकानंद हे तरुणांसाठी नेहमीच प्रेरणास्थान राहिले आहेत. युवक सामाजिक बदल घडवून आणू शकतात, असा त्यांचा विश्वास होता. तरुणांच्या शाश्वत ऊर्जेला जागृत करण्याचा आणि प्रेरित करण्याचा एक उत्तम मार्ग म्हणून स्वामी विवेकानंदांकडे पाहिले जाते, असे उद्‌गार प्रा. विवेक पाटणे यांनी काढले.

नागठाणे येथील आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये विवेकानंद जयंती सप्ताहाच्या सांगताप्रसंगी ते बोलत होते. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव अध्यक्षस्थानी होते. कृषिभूषण मनोहर साळुंखे, नागठाणे भाग पत्रकार संघाचे अध्यक्ष



**नागठाणे : कार्यक्रमात बोलताना प्रा. विवेक पाटणे. त्या वेळी डॉ. अजितकुमार जाधव, मनोहर साळुंखे, विकास जाधव, शरद पवार आदी.**

विकास जाधव, पत्रकार शरद पवार आदी उपस्थित होते.

प्रा. पाटणे म्हणाले, ''स्वामी विवेकानंदांना केवळ ३९ वर्षांचे आयुष्य लाभले. या कमी आयुष्यात त्यांनी अजोड कार्य केले. त्यांना युवकांकडून अधिक अपेक्षा होती. ते युवकांना उद्देशून म्हणत त्याग, सेवा, बल, श्रद्धा आणि आत्मविश्वास ही पंचसूत्रे युवकांच्यात असली पाहिजेत. प्रत्येक युवकाने स्वतःवर श्रद्धा आणि विश्वास ठेवला पाहिजे.''

अध्यक्ष प्राचार्य डॉ. जाधव, मनोहर साळुंखे, विकास जाधव यांनीही मनोगत केले. या वेळी झालेल्या रांगोळी, चित्रकला, निबंध, सुगम गायन व वक्तृत्वसह विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थी संघाकडून रोख रक्कम, प्रमाणपत्र देण्यात आली. कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले. प्रा. संतोष निलाखे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. रणधीर शिलेवंत यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. स्मिता कालभूषण, आर्यन कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संजय बागल यांनी आभार मानले.

Satara, Satara-Today
21/01/2023 Page No. 3

# ग्रामविकास आरोग्य संपन्न आणि सदृढ आरोग्याचा पाया डॉ.राजाराम कांबळे

**सातारा न्यूज :**

**देशमुखनगर :** गावाची समृद्धता ही त्या गावाच्या सौंदर्यावर अवलंबून असते. लोक सहभागातून लोक चळवळ उभी करून शुद्ध आणि सुरक्षित पिण्याचे पाणी घराची स्वच्छता आणि अन्नाची काळजी, वैयक्तिक स्वच्छता, परिसर स्वच्छता, सांडपाण्याचे नियोजन, घनकचऱ्याचे व्यवस्थापन आणि मानवी मलमूत्राची विल्हेवाट यासारखी गाव विकासाची कामे उत्स्फूर्तपणे केल्यास गावाचा कायापालट होऊन नागरिकांना आरोग्यदायी



जीवन जगता येते. म्हणून ग्रामविकास हा आरोग्य संपन्न आणि सदृढ आरोग्याचा पाया आहे असे उद्गार डॉ.राजाराम कांबळे यांनी काढले . श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे आसनगाव ता. जि सातारा येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात आरोग्याचा मूलमंत्र ग्रामविकास या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक श्री.एस.एच.पवार हे होते. डॉ. कांबळे आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, स्वच्छतेचे महत्व जाणून महात्मा गांधी आणि रस्ते , शौचालये, नाले स्वच्छ केले . आयुष्यभर चिंध्यांचे वस्त्र पांघरुण संपूर्ण गाव स्वच्छ केल्यानंतर तळहातावर भाकरी घेऊन खाणारे संत गाडगेबाबा यांनी ग्रामविकासात गावाच्या स्वच्छतेला महत्व दिले. गावं आणि शहरं स्वच्छ केली. त्याचबरोबर रात्री कीर्तनाच्या माध्यमातून लोकांची मनं निर्मळ आणि स्वच्छ केली.

जनसामान्यांचा बुलंद आवाज
कर्मयोगी
Karmayogi
मोबा.9326133731 सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर
कराड (सातारा) वर्ष:२३ अंक:१९१ RNI NO.MAH-MAR/2001/3806 संपादिका:सौ.मंगल लोखंडे प्रबंध संपादक:श्री.संजय पवार गुरुवार दि.१२ जानेवारी २०२३ पाने ४ किंमत २ रुपये
Karad(Satara) Vol-23 Ishue-191 RNI NO.MAH-MAR/2001/3806 Editor Mrs.Mangal Lokhande Thursday 12 January 2023 Pages 4 Price 2 Rs.

डॉ.धनंजय खैर (होमिओपॅथी तज्ञ) यांचे
३० वर्षांचा अनुभव असलेले कराडमधील एकमेव
होमिओपॅथी क्लिनीक
ऑपरेशन शिवाय नाकातील वाढलेले हाड, मुळव्याध, पित्ताशयातील खडा, दमा यासारख्या जुनाट आजारावरील उपचारासाठी भेटा.

# नागठाणे कॉलेजमध्ये श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहाचे आयोजन

**नागठाणे,दि.११(प्रतिनिधी)**

नागठाणेच्या आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये सांस्कृतिक विभाग व जिमखाना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१२ जानेवारी २०२३ ते १९ जानेवारी २०२२ या कालावधीत श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव यांनी दिली.

सप्ताहाचे उद्घाटन प्रतिमापूजन आणि प्रभात फेरीने होणार असून दुसऱ्या दिवशी शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय कराडचे माजी इतिहास विभाग प्रमुख प्रा.ए.जी.थोरात हे 'शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे: जीवन व कार्य' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

सप्ताहामध्ये रांगोळी, निबंध, चित्रकला, वक्तृत्व इत्यादी स्पर्धांबरोबरच क्रीडा विभागाच्यावतीने सांघिक व वैयक्तिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या जन्मदिनानिमित्त ज्ञान शिदोरी दिन- ग्रंथदान व ग्रंथप्रदर्शन कार्यक्रम, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने रक्तदान शिबीर, ज्येष्ठ नागरीक चालणे स्पर्धा इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर सप्ताहाच्या विविध स्पर्धा व उपक्रमांच्या उद्घाटन प्रसंगी अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन यशवंत हरी साळुंखे, नागठाणे गावच्या सरपंच सौ.रूपाली बेंद्रे, उपसरपंच अनिल साळुंखे, संजय साळुंखे, सचिन साळुंखे, मारुती जेधे, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष गणेश साळुंखे व पदाधिकारी तसेच पंचक्रोशीतील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सप्ताहाच्या समारोप कार्यक्रमाप्रसंगी रामकृष्ण विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेजचे प्रा.विवेक पाटणे हे 'युवकांचे प्रेरणास्थान : स्वामी विवेकानंद' विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून कृषीभूषण मनोहर (भाऊ) साळुंखे, नागठाणे भाग पत्रकार संघाचे अध्यक्ष विकास जाधव हेही उपस्थित राहणार आहेत.

याप्रसंगी सप्ताहमधील विविध स्पर्धांमधील विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात येणार आहे.

सदर सप्ताहामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव यांनी केले आहे.

जनसामान्यांचा बुलंद आवाज
# कर्मयोगी
Karmayogi ▮मोबा.9326133731 सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर
▮कराड (सातारा) वर्ष:२३ ▮अंक:१९८ RNI NO.MAH-MAR/2001/3806 / संपादिका:सौ.मंगल लोखंडे / प्रबंध संपादक:श्री.संजय पवार ▮शुक्रवार दि.२० जानेवारी २०२३ ▮पाने ४ ▮किंमत २ रुपये
▮Karad(Satara) Vol-23 ▮Ishue-198 RNI NO.MAH-MAR/2001/3806 / Editor Mrs.Mangal Lokhande / ▮Friday 20 January 2023 ▮ Pages 4 ▮Price 2 Rs.

डॉ.धनंजय खैर (होमिओपॅथी तज्ञ) यांचे
१० वर्षांचा अनुभव असलेले कराडमधील एकमेव
होमिओपॅथी क्लिनीक
ऑपरेशन शिवाय नाकातील वाढलेले हाड, मुतखडा, पित्ताशयातील खडा, दमा यासारख्या जुनाट आजारावरील उपचारासाठी भेटा.

# नागठाणे कॉलेजमध्ये प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा




**नागठाणे,दि.१९(प्रतिनिधी)**

नागठाणेच्या आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहामध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला.

वाढदिवसाप्रसंगी ज्ञानशिदोरी दिनानिमित्त व मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे औचित्य साधून मराठी भेट दिले. यावेळी महाविद्यालयातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ग्रंथदान करण्यात आले.तसेच ग्रंथ वाचनामध्ये प्रमुख पाहुणे, प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

या विविध उपक्रमांचे उद्घाटन शेंद्रे येथील अजिंक्यतारा सहकारी

# प्रीतिसंगम

www.pritisangam.com सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

शनिवार | दिनांक:१४ जानेवारी २०२३ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MA पोस्ट परवाना No.


## डॉ.बापूजी साळुंखे यांचे कार्य आजच्या पिढीला आदर्शवत व प्रेरणादायी

***नागठाणे:प्रतिनिधी:***

शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्य आजच्या पिढीला आदर्शवत व प्रेरणादायी आहे. असे उदगार प्रमुख मार्गदर्शक कराड येथील शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालयातील माजी इतिहास विभागप्रमुख प्रा.ए.जी.थोरात यांनी काढले.



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे महाविद्यालयात श्री.स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहानिमित्त आयोजित 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे: जीवन व कार्य'या विषयावरील व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव हे होते.

प्रा.ए.जी.थोरात आपल्या भाषणात म्हणाले पुढे म्हणाले की, सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्याने देशाला दिलेला तेजस्वी सूर्य क्रांतीसुर्य डॉ.बापूजींनी ज्ञान शक्ती आणि भक्तीच्या जोरावर महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर ज्ञानाची गंगोत्री बहुजनांच्या दारापर्यंत पोहचविण्याचे दैदिप्यमान कार्य केले.त्याचबरोबर राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद व डॉ.बापूजी साळुंखे या महान विभूतींचे कार्य चिरंतन ठेवण्याची जबाबदारी आजच्या पिढीची आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव आपल्या भाषणात म्हणाले की, डॉ.बापूजींनी बालपणापासूनच विशिष्ट ध्येय निश्चित करुन त्या वाटेवर अविरतपणे चालत राहिले. म्हणूनच ते इप्सित ध्येयापर्यंत पोहचू शकले. तसेच डॉ. बापूजींनी दिलेले विचारधन व तत्वे आत्मसात करून स्वतःला समृद्ध करावे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.संतोष निलाखे यांनी पाहुण्यांची ओळख प्रा. रघुनाथ गवळी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. आर. एम.कांबळे यांनी केले तर आभार जिमखाना विभागप्रमुख प्रा.लक्ष्मण दोडमणी यांनी मानले.

सदर कार्यक्रमाचे संयोजन सांस्कृतिक व जिमखाना विभागाने केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक, बहुसंख्येने उपस्थित होते.

जनसामान्यांचा बुलंद आवाज
# कर्मयोगी
Karmayogi ▮मोबा.9326133731 सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर

▮कराड (सातारा) वर्ष:२३ ▮अंक:१४९ RNI NO.MAH-MAR/2001/3806 / संपादिका:सौ.मंगल लोखंडे / प्रबंध संपादक:श्री.संजय पवार ▮गुरुवार दि.२४ नोव्हेंबर २०२२ ▮पाने ४ ▮किंमत २ रुपये

▮Karad(Satara) Vol-23 ▮Ishue-149 RNI NO.MAH-MAR/2001/3806 /Editor Mrs.Mangal Lokhande/ ▮Thursday 24 November 2022 ▮ Pages 4 ▮Price 2 Rs.

डॉ.धनंजय खैर (होमिओपॅथी तज्ञ) यांचे
३० वर्षांचा अनुभव असलेले कराडमधील एकमेव
होमिओपॅथी क्लिनीक
ऑपरेशन शिवाय नाकातील वाढलेले हाड, मुतखडा, पिताशयातील खडा, दमा यासारख्या जुनाट आजारावरील उपचारासाठी भेटा.
टिळक हायस्कुल जवळ, कराड मोबा:९३७०३३२४१३

# शिवाजी विद्यापीठाकडून नागठाणे महाविद्यालयास सन्मानचिन्ह बहाल



**नागठाणे,दि.२३(प्रतिनिधी)** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दिनांक १८ नोव्हेंबर २०२२ रोजी संपन्न झालेल्या विद्यापीठाच्या ६० व्या हिरक महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त आर्टस् ण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाला **NAACMoA+** मानांकन मिळाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ सभागृहामध्ये मा. नामदार कॅबिनेट मंत्री चंद्रकांतदादा पाटील,बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.(डॉ.) डी.टी.शिर्के, प्र. कुलगुरु प्रा.(डॉ.)पी.एस.पाटील यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव यांना सन्मानचिन्ह देऊन महाविद्यालयाच्या वतीने गौरविण्यात आले. राष्ट्रीय मूल्यांकन समितीकडून महाविद्यालयाचे सर्वांगीण मूल्यमापन झाले होते. यावेळी महाविद्यालयाने CGPA ३.४२ मिळवून **A+** मानांकन मिळविले होते. शिवाजी विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील **A+** मानांकन मिळविणारे एकमेव महाविद्यालय ठरले. महाविद्यालयाची सर्वांगीण गुणवत्ता लक्षात घेता विद्यापीठाने महाविद्यालयाच्या सर्वांगीण गुणवत्तेबद्दल यथोचित सन्मान केला.

याप्रसंगी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगीताई गावडे, सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ.राजेंद्र शेजवळ, सहसचिव (अर्थ) प्राचार्य एस.एम.गवळी यांनी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील, प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव, आय. क्यू. ए.सी.चे समन्वयक डॉ.सुरेश पाटील, सर्व सहकारी प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व आजी-माजी विद्यार्थी-विद्यार्थीनी, ग्रामस्थ इत्यादी घटकांचे अभिनंदन केले.

सकाळ » TODAY

· Registered · Date of Publication : मंगळवार, १५ नोव्हेंबर २०२२
· Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily.
· आर.एन.आय.-एम.ए.एच.एम.ए.आर/२००३/१०६७०, रजि. नं. पी.सी.डब्ल्यू./०६९/२०२१-२०२३.

सातारा, मंगळवार, १५ नोव्हेंबर २०२२



# नागठाण्याच्या कॉलेजमध्ये ग्रामीण पत्रकारितेवर चर्चासत्र

नागठाणे, ता. १४ : येथील आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये मराठी विभाग व प्रसिद्धी विभागाच्या वतीने 'ग्रामीण पत्रकारिता : आमचे अनुभव' या विषयावर चर्चासत्र झाले.

प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव, नागठाणे विभाग बहुद्देशीय पत्रकार संघाचे अध्यक्ष विकास जाधव, उपाध्यक्ष दत्तात्रय घाडगे तसेच सदस्यांची उपस्थिती होती. यावेळी दत्तात्रय घाडगे यांनी समाजकार्याची आवड असणाऱ्यांसाठी पत्रकारितेमध्ये मोठी संधी असल्याचे नमूद केले. प्राचार्य डॉ. जाधव यांनी पत्रकार हा पत्रकारितेच्या माध्यमातूनं समाजाची सेवा करत असतो. समाजाला विधायक दिशा देण्याचे कामही त्याच्याकडून केले जात असल्याचे सांगितले.



नागठाणे (ता. सातारा) : चर्चासत्रात बोलताना दत्तात्रय घाडगे. समवेत विकास जाधव, सुहास काजळे आदी.

ज्येष्ठ पत्रकार संभाजी चव्हाण, संजय कांबळे, सतीश जाधव, प्रताप भोसले, सुहास काजळे, शरद पवार, सूर्यकांत पवार, अमित जगताप, सचिन पडवळ, धनाजी कणसे, प्रकाश काशीळकर आदी उपस्थित होते. मराठी विभागप्रमुख प्रा. आर. सी. गवळी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आर. एम. कांबळे यांनी आभार मानले. प्रा. एस. के. आतार यांनी सूत्रसंचालन केले.

मराठी विभागाच्या प्रा. एस. के. कालभूषण, प्रा. एस. एस. सालवाडगी, प्रसिद्धी विभागाचे सदस्य प्रा. संदीप लोखंडे, प्रा. रणधीर शिलवंत यांनी परिश्रम घेतले. मराठी विभागातर्फे बातमी लेखन भित्तिपत्रिकेचे उद्‌घाटन अध्यक्ष श्री. जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उपस्थित पत्रकारांनी उत्तरे दिली.

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते

जाहीर नोटीस

पुढारी

# एकांकिका स्पर्धेत नागठाणे कॉलेजला ५ पारितोषिके

**नागठाणे : पुढारी वृत्तसेवा**

सांगली येथे अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा सांगली आयोजित पीएनजी महाकरंडक एकांकिका स्पर्धेत नागठाणेच्या आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेजने एकूण पाच पारितोषिके प्राप्त केली.

या एकांकिका स्पर्धेत सांघिक प्रकारामध्ये फराळ या एकांकिकेने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. तसेच वैयक्तिक प्रकारामध्ये स्त्री अभिनयास कु. सुजाता सपकाळ हिने 'सई' या पात्राची सर्वोत्कृष्ट भूमिका साकारून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. तर दिग्दर्शन व प्रकाश योजना



महाकरंडक एकांकिका स्पर्धेतील पारितोषिके प्राप्त टीमसमवेत मान्यवर.

यांसाठी कु.ऋतुजा पवार हिला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. कु. प्रीती मोहिते हिला पार्श्वसंगीत यांसाठी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या अगोदर 'फराळ' एकांकिकेला शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते.

याप्रसंगी सर्व यशस्वी स्पर्धक व सहकलाकार पुनम मुसळे, सुजाता सपकाळ, दीक्षा कुंभार, शीतल बिडे, करिष्मा काळभोर, संध्या पवार, श्रद्धा यादव, निकिता पवार, प्रिती मोहिते ऋतुजा पवार, जय लोरे, राहुल कुंभार, एकांकिकेचे दिग्दर्शक नितीन पवार तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.संतोष निलाखे व त्यांचे सदस्य डॉ. राजाराम कांबळे, प्रा. रघुनाथ गवळी, प्रा.जयमला उथळे, प्रा. जयसिंग राठोड व प्रा. स्मिता कालभूषण यांचे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ.राजेंद्र शेजवळ, प्राचार्य एस.एम.गवळी, प्र.प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव आदींनी अभिनंदन केले.

My Satara Edition
Nov 21, 2022 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

एकमेव विचारपत्र
# महाराष्ट्र न्यूज




Website : https://mahanewsnet.com   Youtube : www.youtube.com/channel/MaharashtraNewslive   Facebook Page : MaharashtraNews Live

सातारा   बुधवार । २३ नोव्हेंबर २०२२ । वर्ष ३१ वे । अंक - ३११ । सातारा, पुणे, कोल्हापूर, सोलापूर येथून एकाचवेळी प्रसिद्ध होणारे दैनिक. । Reg.RNI No.-MAHMAR/49976/91 । पाने -४ । किंमत - ५ रुपये

# आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज नागठाणे येथे महिला सुरक्षा बाबत निर्भयाचे मार्गदर्शन



**महाराष्ट्र न्यूज नेटवर्क**

**सातारा, दि. २२ नोव्हेंबर :** आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज नागठाणे या ठिकाणी, निर्भया पथक सातारा आणि बोरगांव पोलिस स्टेशन मधील पोलीस निरीक्षक मछले यांनी महिला सुरक्षा आणि निर्भया पथकाची भूमिका या विषयावर तसेच मुलींच्या सुरक्षिततेसाठी निर्भया प्रबोधन पर मार्गदर्शन केले, तसेच मुलींना आणि मुलांना आपलं शिक्षणाकडे लक्ष द्यावे काही अडी अडचणी असल्यास पोलिस दलाचे संपर्क करावा व कोणी गैरवर्तन केलेस त्यास योग्य ती कारवाई करून आम्ही वेळीच कायदेशीर समज देऊ , तसेच दैनंदिन जीवनामध्ये मुलींना होणारे छेडछाड तसेच मानसिक त्रास कोणी देत असल्यास आपण त्यास कशा प्रकारे सामोरे जावे याबद्दल मार्गदर्शन केले दरम्यान निर्भया महिला पोलिस राठवडे यांनी मुलींनी कोणत्याही दबावाला बळी न पडता मनमोकळे पणाने आपले अडचणी सांगाव्या, या करिता निर्भया पथक पोलिस चौकी या ठिकाणी येऊन अर्ज कशा प्रकारे करावे हे सांगितले या कार्यक्रमावेळी सातारा विभागातील निर्भया पथकातील पो. कॉ. समाधान बर्गे, , पो .कॉ बादशहा नदाफ, प्रशांत मोरे उपस्थित होते तसेच या कॉलेजचे.प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव सर, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संदीप लोखंडे, आणि आभार प्रा. जयमाला उथळे यांनी केले आणि सूत्रसंचालन प्रा. शितल सालवडागी यांनी केले. यावेळी विद्यार्थी - विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# पत्रकारांनी बातमीचा पाठपुरावा करणे गरजेचा

## बहुउद्देशीय पत्रकार संघाचे उपाध्यक्ष दत्तात्रय घाडगे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

नागठाणे

नागठाणे (ता.सातारा) येथील आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये मराठी विभाग व प्रसिद्ध विभागातर्फे आयोजित 'ग्रामीण पत्रकारिता : आमचे अनुभव' या विषयावरील कार्यक्रम नुकताच पार पडला. या कार्यक्रमासाठी नागठाणे पंचक्रोशीतील पत्रकार उपस्थित होते. यावेळी त्यांनी पत्रकारितेतील अनुभव कथन केले.

यावेळी नागठाणे विभाग बहुउद्देशीय पत्रकार संघाचे उपाध्यक्ष दत्तात्रय घाडगे म्हणाले, समाजकार्याची आवड असणाऱ्यांसाठी पत्रकारितेमध्ये खूप संधी आहेत. पत्रकाराने फक्त बातमी देऊन न थांबता त्या बातमीचा पाठपुरावा करणे गरजेचे असते तर पत्रकार सुहास काजळे म्हणाले, ग्रामीण पत्रकारिता हा समाज जीवनाचा आरसा असतो. सामाजिक विकासासाठी पत्रकारांची भूमिका महत्त्वाची आहे.

ज्येष्ठ पत्रकार संजय कांबळे म्हणाले, पत्रकारिता हा सामान्य जनता आणि प्रशासन यांच्यातील दुवा असतो. पत्रकाराने घटनेमागील घटना जाणून घेतली पाहिजे. तिची चिकित्सा केली पाहिजे.

### पत्रकारिता लोकशाहीचा मुख्य आधारस्तंभ

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव म्हणाले, पत्रकार हा पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाची सेवा करीत असतो. पत्रकारिता हा लोकशाहीचा मुख्य आधारस्तंभ असून समाजाला विधायक दिशा देण्याचे काम करीत असतो.

**नागठाणे कॉलेज मध्ये 'ग्रामीण पत्रकारिता :आमचे अनुभव' विषयावर चर्चासत्र**

यावेळी संजय कांबळे, प्रकाश काशीळकर यांनीही मनोगते व्यक्त केली. याप्रसंगी सर्व पत्रकारांनी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. मराठी विभागाच्या वतीने आयोजित 'बातमी लेखन' भित्तीपत्रिकेचे उद्घाटन नागठाणे विभाग पत्रकार संघाचे अध्यक्ष विकास जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष दत्तात्रय घाडगे, ज्येष्ठ पत्रकार संभाजी चव्हाण, संजय कांबळे, सतीश जाधव, प्रताप भोसले, सुहास काजळे, शरद पवार, सुर्यकांत पवार, अमित जगताप, सचिन पडवळ, धनाजी कणसे, प्रकाश काशीळकर पत्रकार उपस्थित होते.

प्रास्ताविक मराठी विभाग व प्रसिद्ध विभाग प्रमुख प्रा.आर.सी. गवळी यांनी केले. आभार डॉ. आर. एम. कांबळे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. एस. के. आतार यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन करण्यामध्ये मराठी विभागाच्या प्रा. एस. के. कालभूषण, प्रा. एस. एस. सालवाडगी, प्रसिद्धी विभागाचे सदस्य प्रा. संदिप लोखंडे, प्रा. रणधीर शिलेवंत यांचे सहकार्य लाभले.

पुढारी
www.pudhari.com

## संक्षिप्त



वक्तृत्व, निबंध स्पर्धेत यश मिळवलेले नागठाणे कॉलेजचे विद्यार्थी.

# नागठाणे कॉलेजचे विविध स्पर्धेत यश

**नागठाणे :** सातारा येथील सुशीलादेवी साळुंखे माध्यमिक विद्यालय, सातारा येथे पार पडलेल्या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे विभागीय स्पर्धेमध्ये नागठाणेच्या आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेजने वक्तृत्व आणि निबंध स्पर्धेत यश संपादन केले. महाविद्यालयीन गटात वक्तृत्व स्पर्धेमध्ये कु. श्रेया देशमुख हिने 'सायबर गुन्हे : नवे युग नवी समस्या' या विषयावर सर्वोत्कृष्ट सादरीकरण करुन प्रथम क्रमांक पटकावला. कु. आदित्य विजय घोरपडे याला प्रथम क्रमांकाचे तर कु. साक्षी आनंद भोसले तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. प्रा.जयसिंग राठोड यांनाही तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. यशस्वी स्पर्धकांचे प्र.प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव, प्रा.संतोष निलाखे आदींनी अभिनंदन केले.

# महिलांची सुरक्षितता, कायदेशीर हक्कासाठी निर्भया पथक

## सहाय्यक पोलीस निरीक्षक सपोनि चेतन मछले



नागठाणे : महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सपोनि चेतन मछले.

प्रतिनिधी
नागठाणे

महिलावरील अत्याचार, लैंगिक छळ, छेडछाड, महिलाविषयक गुन्हे नियंत्रित करणे आणि गुन्हेगारांची मानसिकता बदलणे हे आजच्या घडीला पोलिसांसमोरील मोठे आव्हान आहे. फोन कॉल, मेसेज, ई-मेल व सोशल मीडियाचा वापर करून किंवा प्रत्यक्षरीत्या महिलेची छेड काढली जाते. अशावेळी महिला व तरुणींना विनाविलंब पोलिसांची मदत उपलब्ध करून देऊन तिच्या मनात सुरक्षितता व कायदेशीर हक्काबाबत जाणीव निर्माण करून देण्याचे कार्य निर्भया पथक करते, असे उद्‌गार बोरगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चेतन मछले यांनी काढले.

नागठाणे (ता.सातारा) येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज महाविद्यालयातील तक्रार निवारण समिती आणि अँटी रॅगिंग समिती यांच्या संयुक्तविद्यमाने 'महिला सुरक्षा आणि निर्भया पथकाची भूमिका' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ अजितकुमार जाधव हे होते.

### सुरक्षेची जबाबदारी सर्वांची

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव म्हणाले, सार्वजनिक ठिकाणी महिला आणि विद्यार्थिनींच्या सुरक्षेची जबाबदारी पोलिस विभाग बरोबरच समाजातील सर्वच घटकांची आहे.

यावेळी सातारा विभाग निर्भया पथकातील काजल राठवडे, समाधान बर्गे, अजित माने, बादशहा नदाफ, तेजस्विनी जाधव, प्रशांत मोरे उपस्थित होते. काजल राठवडे यांनी देखील निर्भया पथकाची भूमिका मांडली. मुलींनी उच्च शिक्षण बरोबरच सेल्फ डिफेन्स चे प्रशिक्षण घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रास्ताविक प्रा. संदीप लोखंडे, आभार प्रा. जयमाला उथळे तर सूत्रसंचालन प्रा. शितल सालवाडगी यांनी केले. यावेळी प्रा. एन. एम. चोबे आदी उपस्थित होते.

पुण्य नगरी

# महिलांच्या सुरक्षितता, हक्कासाठी निर्भया पथक

## सपोनि चेतन मछले

**टिटवेवाडी :** महिलावरील अत्याचार, लैंगिक छळ, छेडछाड, महिलाविषयक गुन्हे नियंत्रित करणे आणि गुन्हेगारांची मानसिकता बदलणे हे आजच्या घडीला पोलिसांसमोरील मोठे आव्हान आहे. फोन कॉल, मेसेज, ई-मेल व सोशल मीडियाचा वापर करून किंवा प्रत्यक्षरीत्या महिलेची छेड काढली जाते. अशावेळी महिला व तरुणींना विनाविलंब पोलिसांची मदत उपलब्ध करून देऊन महिलांच्या मनात सुरक्षितता व कायदेशीर हक्काबाबत जाणीव निर्माण करून देण्याचे काम निर्भया पथक करते, असे प्रतिपादन बोरगांव पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक चेतन मछले यांनी केले.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना चेतन मछले. (छाया: किरण पवार)

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित नागठाणे, ता. सातारा येथील आर्ट्स अँण्ड कॉमर्स कॉलेजमधील तक्रार निवारण समिती आणि अँटी रॅगिंग समिती यांच्यावतीने महिला सुरक्षा आणि निर्भया पथकाची भूमिका या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी ते बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव यांच्या अध्यक्षस्थानी होते. सातारा विभाग निर्भया पथकातील काजल राठवडे, समाधान बर्गे, अजित माने, बादशहा नदाफ, तेजस्विनी जाधव, प्रशांत मोरे हे उपस्थित होते. काजल राठवडे यांनी निर्भया पथकाची भूमिका मांडली. मुलींनी उच्च शिक्षण बरोबरच सेल्फ डिफेन्सचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. डॉ. अजितकुमार जाधव यांनी मार्गदर्शन केले. प्रा. संदीप लोखंडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. जयमाला उथळे यांनी आभार मानले.

Satara Edition
Nov 29, 2022 Page No. 06
Powered by : eReleGo.com

# पी.एन.जी.महाकरंडक एकांकिका स्पर्धेमध्ये नागठाणे कॉलेजला पाच पारितोषिके

सातारा न्यूज;

**देशमुखनगर :** सांगली येथे अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा सांगली आयोजित पीएनजी महाकरंडक एकांकिका स्पर्धेत नागठाणेच्या आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेजने एकूण पाच पारितोषिके प्राप्त केली.सदर एकांकिका स्पर्धेत सांघिक प्रकारामध्ये फराळ या एकांकिकेने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले. तसेच वैयक्तिक प्रकारामध्ये स्त्री अभिनयास कु.सुजाता सपकाळ हिने 'सई' या पात्राची सर्वोत्कृष्ट भूमिका साकारून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. तर दिग्दर्शन व प्रकाश योजना यांसाठी कु.ऋतुजा पवार हिला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.तसेच कु.प्रीती मोहिते हिला पार्श्वसंगीत यांसाठी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

याप्रसंगी सर्व यशस्वी स्पर्धक व सहकलाकार कु.पुनम मुसळे, कु.सुजाता सपकाळ, कु.दीक्षा कुंभार कु.शितल बिडे,कु.करिष्मा काळभोर कु.संध्या पवार, कु.श्रद्धा यादव, कु.निकिता पवार, प्रिती मोहिते कु.ऋतुजा पवार, जय लोरे, राहुल कुंभार, एकांकिकेचे दिग्दर्शकनितीन पवार तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.संतोष निलाखे व त्यांचे सदस्य डॉ. राजाराम कांबळे, प्रा. रघुनाथ गवळी, प्रा.जयमला उथळे, प्रा. जयसिंग राठोड व प्रा. स्मिता कालभूषण यांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगीताई गावडे, सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ.राजेंद्र शेजवळ, सहसचिव (अर्थ) प्राचार्य एस.एम.गवळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव, सहकारी प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व आजी-माजी विद्यार्थी-विद्यार्थीनी, ग्रामस्थ इत्यादींनी अभिनंदन केले.

पुढारी

# महिलांची सुरक्षितता व कायदेशीर हक्कांसाठी निर्भया पथक : चेतन मछले

**नागठाणे : पुढारी वृत्तसेवा**

महिलांवरील अत्याचार, लैंगिक छळ, छेडछाड, महिलाविषयक गुन्हे नियंत्रित करणे आणि गुन्हेगारांची मानसिकता बदलणे हे आजच्या घडीला पोलिसांसमोरील मोठे आव्हान आहे. महिला व तरुणींना विनाविलंब पोलिसांची मदत उपलब्ध करून देऊन तिच्या मनात सुरक्षितता व कायदेशीर हक्काबाबत जाणीव निर्माण करून देण्याचे कार्य निर्भया पथक करते, असे उद्‌गार सपोनि चेतन मछले यांनी काढले.



नागठाणे येथे कार्यक्रमात बोलताना सपोनि चेतन मछले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था , कोल्हापूर संचलित आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे महाविद्यालयातील तक्रार निवारण समिती आणि अँटी रॅगिंग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महिला सुरक्षा आणि निर्भया पथकाची भूमिका या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ अजितकुमार जाधव हे होते .

चेतन मछले म्हणाले, महिला अथवा तरुणींची छेडछाड होण्याची शक्यता असणारी ठिकाणी निर्भया पथकामार्फत शोधून काढण्यात येतात. त्यामध्ये शाळा, महाविद्यालय, बसस्थानके, बाजारपेठा, महिला वसतिगृहे, सिनेमा हॉल इत्यादी ठिकाणी टेहाळणी करून त्यांना सुरक्षितता प्राप्त करून दिली जाते. त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी चांगला अभ्यास करून स्वतःचे भविष्य उज्ज्वल करावे व महाविद्यालयात येता-जाता कोणी त्रास देत असेल तर तत्काळ निर्भया पथकाशी संपर्क साधावा .

सातारा विभाग निर्भया पथकातील काजल राठवडे, समाधान बर्गे, अजित माने, बादशहा नदाफ, तेजस्विनी जाधव, प्रशांत मोरे हे उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रा. संदीप लोखंडे, आभार प्रा. जयमाला उथळे तर सूत्रसंचालन प्रा. शितल सालवाडगी यांनी केले. यावेळी प्रा. एन. एम. चोबे, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी - विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

My Satara Edition
Nov 24, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# जे.एस.पाटलांचे व्यक्तिमत्व बापुजींना अभिप्रेत असणारे

## अभयकुमार साळुंखे; प्रकाशन समारंभ उत्साहात

सत्य सह्याद्री न्यूज नेटवर्क

शेंद्रे : प्राचार्य डॉ.जे. एस. पाटील यांनी कुशल प्रशासन, कार्यक्रमाचे अचूक नियोजन, दूरदृष्टी, उद्यमशीलता, नैतिकता, प्रामाणिक प्रयत्न, अभ्यासूवृत्ती, वक्तशीरपणा कार्यतत्परता, आर्थिक काटकसर, संशोधक वृत्ती, दृढ आत्मविश्वास यांसारखे गुण आत्मसात करून गुणांच्या जोरावर बापुजींना अभिप्रेत असणारे व्यक्तिमत्व विकसित केले. असे उद्गार कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे महाविद्यालयात प्राचार्य डॉ.जे.एस. पाटील यांच्या कृतज्ञता, सेवा गौरव व प्रकाशन समारंभाच्या प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे जेष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.जे.एफ.पाटील होते. ते म्हणाले की, जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास व कठोर परिश्रमाच्या जोरावर प्राचार्य डॉ.जे.एस. पाटील यांनी विविध समस्यांवर मात करून आलेल्या संधीचे सोने केले. त्यांनी नागठाणे महाविद्यालयाला मानांकन प्राप्त करून देऊन ग्रामीण भागातील नागठाणे महाविद्यालयाचे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचविले.



शेंद्रे : जे. एस. पाटील यांचा सत्कार करताना मान्यवर.

या कार्यक्रमाला प्राचार्य पुरुषोत्तम शेठ, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ, डॉ. विजयकुमार पाटील, संदीप लोखंडे, प्रा.ए.बी. कणसे, मनोहर साळुंखे, प्रा.प्रियंका पाटील येडके, बाळकृष्ण साळुंखे तसेच अक्षय कदम, ऐश्वर्या पाटणकर उपस्थित होते.

याप्रसंगी कार्य कर्तव्य या ग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच ग्रामस्थ व महाविद्यालय, आप्तेष्ट, हितचिंतक व मान्यवरांच्या वतीने प्राचार्य डॉ.जे.एस.पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अजितकुमार जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.शोभा लोहार यांनी तर आभार प्रा.डॉ.सुरेश पाटील यांनी मानले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील पदाधिकारी, हतचिंतक, विविध महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी उपस्थित होते.

## संक्षिप्त



नागठाणे : शिक्षकांसमवेत यशस्वी विद्यार्थी.

# नागठाणे कॉलेज वक्तृत्वमध्ये प्रथम, एकांकिकेत तृतीय

**कराड :** कराड येथील सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजमध्ये पार पडलेल्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत ४२ व्या सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये नागठाणेच्या आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेजने मराठी वक्तृत्व स्पर्धेमध्ये कु. श्रेया देशमुख हिने सर्वोत्कृष्ट सादरीकरण करुन प्रथम क्रमांक पटकावला. तसेच 'फराळ' या एकांकिकेतील सर्व कलाकारांनी उत्कृष्ट सादरीकरण करुन सदर एकांकिकेला तृतीय क्रमांक मिळविला. यशस्वी स्पर्धक, सहकलाकार, एकांकिकेचे दिग्दर्शक नितीन पवार तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.संतोष निलाखे यांचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

पुण्य नगरी

# शिवाजी विद्यापीठाकडून नागठाणे महाविद्यालयास सन्मानचिन्ह

टिटवेवाडी/प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दिनांक १८ नोव्हेंबर रोजी संपन्न झालेल्या विद्यापीठाच्या ६० व्या हिरक महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयाला नॅकचे अ + मानांकन मिळाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ सभागृहामध्ये मंत्री चंद्रकांतदादा पाटील, बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरु




नागठाणे : एकांकिका स्पर्धेत यश मिळाल्यानंतर विद्यार्थ्यां सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य अजितकुमार जाधव व प्राध्यापक वृंद.

प्रा.(डॉ.) पी. एस. पाटील यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव यांना सन्मानचिन्ह देऊन महाविद्यालयाच्या वतीने गौरविण्यात आले.

यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या शुभांगीताई गावडे, सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ, सहसचिव (अर्थ) प्राचार्य एस. एम. गवळी यांनी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील, प्र. प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. सुरेश पाटील, सर्व सहकारी प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व आजी-माजी विद्यार्थी-विद्यार्थीनी, ग्रामस्थ इत्यादी घटकांचे अभिनंदन केले.

Satara Edition
Nov 21, 2022 Page No. 6
Powered by : eReleGo.com

# मराठी वक्तृत्व स्पर्धेत नागठाणे कॉलेज प्रथम

वार्ताहर
परळी

कराड येथील सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजमध्ये पार पडलेल्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत ४२ व्या सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये नागठाणेच्या आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेजने मराठी वक्तृत्व स्पर्धेमध्ये श्रेया देशमुख हिने सर्वोत्कृष्ट सादरीकरण करुन प्रथम क्रमांक पटकावला.

तसेच 'फराळ' या एकांकिकेतील सर्व कलाकारांनी उत्कृष्ट सादरीकरण करुन सदर एकांकिकेला तृतीय क्रमांक मिळविला. याप्रसंगी सर्व यशस्वी स्पर्धक, सहकलाकार, एकांकिकेचे दिग्दर्शक नितीन पवार तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. संतोष निलाखे व त्यांचे सर्व सदस्य यांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ, सहसचिव (अर्थ) प्राचार्य एस. एम. गवळी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव, सहकारी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी अभिनंदन केले.



कराड : सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजमध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये सुयश प्राप्त केलेले विद्यार्थी, विद्यार्थीनी.

दैनिक मुक्तागिरी

# नागठाणे कॉलेज मराठी वक्तृत्व मध्ये प्रथम तर एकांकिका स्पर्धेमध्ये तृतीय



**नागठाणे** : कराड येथील सदगुरुगाडगे महाराज कॉलेजमध्ये पार पडलेल्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत ४२ व्या सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये नागठाणेच्या आर्टस् एड कॉमर्स कॉलेजने मराठी वक्तृत्व स्पर्धेमध्ये कु.श्रेया देशमुख हिने सर्वोत्कृष्ट सादरीकरण करून प्रथम क्रमांक पटकावला.

तसेच 'फराळ' या एकांकिकेतील सर्व कलाकारांनी उत्कृष्ट सादरीकरण करून सदर एकांकिकेला तृतीय क्रमांक मिळविला.

याप्रसंगी सर्व यशस्वी स्पर्धक,सहकलाकार,

मार्गदर्शक तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.संतोष निलाखे व त्यांचे सर्व सदस्य यांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ.राजेंद्र शेजवळ सहसचिव (अर्थ) प्राचार्य एस. एम.गवळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव,सहकारी प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी अभिनंदन केले.

कर्मयोगी शनिवार,दि.१२ नोव्हेंबर २०२२

# नागठाणे कॉलेजमध्ये तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्‌घाटन

**नागठाणे,दि.११(प्रतिनिधी)** नागठाणेच्या आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये वाणिज्य विभागाच्यावतीने तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचा उद्‌घाटन समारंभ संपन्न झाला.

सदर कार्यशाळेप्रसंगी कार्यशाळेचे प्रमुख उद्घाटक नागठाणे गावचे सुपुत्र कृषीभूषण मनोहर साळुंखे म्हणाले की, उद्योजकीय गुण विकसित करण्यासाठी प्रशिक्षणाची गरज असून प्रशिक्षित उद्योजकतेमुळे देशाच्या विकासामध्ये मोलाची भर पडते.

याप्रसंगी प्रमुख पाहुण्या माणदेशी फाउंडेशनच्या प्रकल्प अधिकारी सौ. अपर्णासावंत म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी यशस्वी उद्योजक होण्यासाठी स्वत:मध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे गरजेचे आहे. तसेच उद्योजकीय क्षेत्रात व्यवसाय करत असताना स्वरोजगाराबरोबर इतरांनाही रोजगार उपलब्ध करून देता येतो.

यावेळी नागठाणे गावच्या यशस्वी उद्योजिका सौ.संजना साळुंखे म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी स्व अनुभवातून व्यावसायिक क्षेत्रात प्रगती करणे गरजेचे असून त्यांना योग्य त्यावेळी मानदेशी फाउंडेशन सहकार्य करण्यास तत्पर असेल.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव म्हणाले की, विद्यार्थ्यांनी कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्राबरोबर व्यवसाय विषयक प्रशिक्षण घेऊन उद्योग क्षेत्रातही प्रगती करावी. कारण स्वत:चे भविष्य उज्वल करण्यासाठी उद्योग क्षेत्रामध्ये खूप मोठ्या संधी आहेत त्याचे विद्यार्थ्यांनी सोने केले पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.संदिप लोखंडे यांनी केले,आभार संकेत चव्हाण व हर्षद भोसले यांनी मानले तर सूत्रसंचालन कु.अवंतिका गडांकुश व कु. नेहा पवार या बी. कॉम.भाग ३ मधील विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. कुलदीप सूर्यवंशी, प्रा.सोनाली साळुंखे व प्रा. प्रतीक्षा कदम यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी - विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.




# नागठाणे कॉलेजमध्ये सहविचार सभा उत्साहात

प्रतिनिधी
नागठाणे

नागठाणे (ता.सातारा) येथील आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये नागठाणे विभाग पत्रकार संघाचे पत्रकार व महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य व प्रसिद्धी विभाग यांची सहविचार सभा उत्साहात नुकतीच पार पडली.

यामध्ये पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष सतीश जाधव, संभाजी चव्हाण, नितीन साळुंखे, प्रताप भोसले, विजय घोरपडे या पत्रकारांचे महाविद्यालयाच्या वतीने प्र. प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव यांनी महाविद्यालयाचा वार्षिक 'शब्दसावल्या' अंक आणि गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या पायाभूत सोयीसुविधा, ग्रंथालय, विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक अभ्यासक्रमपूरक उपक्रमांची माहिती देण्यात आली.



**नागठाणे : स्वामी विवेकानंदांच्या पुतळयाला अभिवादन करताना पत्रकार व प्राध्यापक.**

महाविद्यालयात चालू वर्षापासून सुरू झालेल्या विज्ञान शाखेच्या प्रथम वर्षाचा प्रवेशासंदर्भात चर्चा झाली. यप्रसंगी बी. एस्सी. भाग-१ च्या प्रवेशाची अंतिम मुदत १ ऑक्टोबर २०२२ पर्यंत असून बी.एस्सी भाग-१ साठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय व पत्रकार संघातर्फे आवाहन करण्याबाबत चर्चा झाली. या सहविचारसभेचे औचित्य साधून पत्रकार संघाच्या वतीने महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. अजितकुमार जाधव यांची नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सदरचर्चेत अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. एस. एस. पाटील, प्रसिद्धी विभाग प्रमुख प्रा. आर. सी. गवळी, डॉ. आर. एम. कांबळे, प्रा. एस्. के आतार आदींनी सहभाग घेतला.

# हिंदी भाषेच्या माध्यमातून करियरच्या अनेक संधी



**नागठाणे/प्रतिनिधी:** 'इंटरनेटच्या आजच्या युगात हिंदी भाषिक कौशल्ये विकसित केल्यास करियरच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत' असे उद्गार साताराच्या छत्रपती शिवाजी कॉलेजच्या हिंदी विभागाचे प्रा.डॉ.संदीप किर्दत यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्टस अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील हिंदी विभागाच्यावतीने १४ सप्टेंबर हिंदी दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानपर कार्यक्रमात 'हिंदी भाषा आणि करियर' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव हे होते.

डॉ. किर्दत पुढे म्हणाले की, हिंदी भाषेमध्ये इतर भाषांच्या तुलनेत गोडवा आहे. ती एक चांगली संपर्क भाषा आहे.विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेवर अधिकार प्राप्त करण्यासाठी, प्रभुत्व मिळविण्यासाठी हिंदीचे वाचन, श्रवण, चिंतन केले पाहिजे. हिंदी भाषेच्या माध्यमातून शिक्षण, अनुवाद, पत्रकारिता, लेखन इ.विविध क्षेत्रात प्राध्यापक, अनुवादक, निवेदक, पत्रकार, लेखक म्हणून करियरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. माहिती तंत्रज्ञानाचा युवकांनी आपल्या करियरसाठी उपयोग करून घेतला पाहिजे. कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्र प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, हिंदीचा राजभाषा, संपर्क भाषा म्हणून वापर होत आहे.कोणत्याही देशाची भाषा ही त्या देशाच्या संस्कृतीची वाहक असते.त्यामुळे देशाचा विकास साधण्यासाठी हिंदी भाषेला राष्ट्रभाषा म्हणून सर्व राज्यांनी पाठिंबा दिला पाहिजे.

याप्रसंगी हिंदी दिनाच्या निमित्ताने आयोजित हिंदी वक्तृत्व, निबंध, शुध्दलेखन, सुलेखन, रांगोळी इ. स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे व पुस्तके देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वागत व पाहुण्यांचा परिचय हिंदी विभागप्रमुख प्रा. एस.के.आतार यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. गणेश गभाले यांनी केले.तर आभार प्रा.रणधीर शिलेवंत यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक, विद्यार्थी- विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होते.




नागठाणे : बोलताना दत्ता घाडगे व व्यासपीठावर इतर मान्यवर.

# नागठाणे कॉलेजमध्ये पत्रकारितेवर चर्चासत्र

**नागठाणे, दि. १२ (प्रतिनिधी)** - येथील आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमध्ये मराठी विभाग व प्रसिद्धी विभागाच्यावतीने आयोजित 'ग्रामीण पत्रकारिता : आमचे अनुभव' या विषयावरील कार्यक्रमासाठी नागठाणे विभागातील पत्रकार उपस्थित होते. यावेळी त्यांनी आपले पत्रकारितेतील अनुभव कथन केले.

नागठाणे विभाग बहुउद्देशीय पत्रकार संघाचे उपाध्यक्ष व दै. प्रभातचे पत्रकार दत्ता घाडगे म्हणाले, 'सामाजिक कार्याची आवड जोपासणाऱ्यांसाठी पत्रकारितेमध्ये खूप संधी आहेत. आपल्या आजूबाजूला दैनंदिन घडणाऱ्या घटनांवर लक्ष ठेवून समाजोपयोगी व सकारात्मक दृष्टीकोनातुन पत्रकारिता करत बातमीचा निर्भिडपणे पाठपुरावा करणे गरजेचे असते. ग्रामीण भागातील विविध समस्या समजून घेऊन पत्रकारितेच्या माध्यमातून प्रशासनासमोर ठेवण्याचे काम करावे लागते.' कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव म्हणाले, "पत्रकारितेच्या माध्यमातून पत्रकार समाजसेवा करीत असतो. पत्रकारिता लोकशाहीची मुख्य आधारस्तंभ असून समाजाला विधायक दिशा देण्याचे काम करीत असते. यावेळी संजय कांबळे, प्रकाश काशीळकर यांनीची भाषणे झाली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सर्व पत्रकारांनी दिली. मराठी विभागाच्यावतीने आयोजित 'बातमी लेखन' भित्तिपत्रिकेचे उदघाटन नागठाणे विभाग पत्रकार संघाचे

अध्यक्ष विकास जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. ज्येष्ठ पत्रकार संभाजी चव्हाण, सतीश जाधव, प्रताप भोसले, सुहास काजळे, शरद पवार, सूर्यकांत पवार, अमित जगताप, सचिन पडवळ, धनाजी कणसे व इतर पत्रकार उपस्थित होते. प्रास्ताविक मराठी विभाग व प्रसिद्ध विभाग प्रमुख प्रा. आर. सी. गवळी यांनी केले. डॉ. आर. एम. कांबळे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. एस.के. आतार यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजनासाठी मराठी विभागाच्या प्रा. एस. के. कालभूषण, प्रा. एस. एस. सालवाडगी, प्रसिद्धी विभागाचे सदस्य प्रा. संदीप लोखंडे, प्रा. रणधीर शिलेवंत यांचे सहकार्य लाभले.

# भाषिक कौशल्य विकसित करणे काळाची गरज:प्रा.टी.एम.आतार




**नागठाणे,दि.२(प्रतिनिधी)** विद्यार्थ्यांनी बदलत्या काळानुसार वाचन, लेखन,श्रवण आणि भाषण इत्यादी भाषिक कौशल्य विकसित करणे काळाची गरज आहे. असे उद्गार कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय,कराड येथील इंग्रजी विभागाच्या प्रा.टी.एम.आतार यांनी यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज,नागठाणे महाविद्यालयातील वाड्;मय मंडळ (मराठी, हिंदी, इंग्रजी) विभागाच्यावतीने आयोजित 'भाषिक कौशल्य आणि संवाद कौशल्य' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.एस.पाटील हे होते.

प्रा.टी.एम.आतार आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, वाड;मय मंडळ हे विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचा व आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य करीत असते. तसेच संवाद कौशल्य ही एक कला आहे. संवाद उत्तम असेल तर श्रोत्यांवर तसेच समाजावर व्यक्तींचा चांगला प्रभाव पडत असतो.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.एस.पाटील आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषांवर प्रभूत्व मिळविले पाहिजे. तसेच भाषिक कौशल्य आत्मसात करून रोजगाराच्या संधी निर्माण केल्या पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख वाड्;मय मंडळ विभागाचे प्रमुख प्रा.रघुनाथ गवळी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.गणेश गभाले यांनी तर आभार प्रा.अशोक गाडेकर यांनी मानले. कार्यक्रमास हिंदी विभाग प्रमुख प्रा.शौकत अतार,इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुरेश पाटील, वाड;मय मंडळाचे सदस्य, महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# शिक्षकांबद्दल कायम कृतज्ञता हाच आपला धर्म

## अजिंक्यतारा सुतगिरणीचे संचालक अजित साळुंखे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
नागठाणे

शिक्षक होण्याचा अनुभव हा अतिशय सुखद असून अध्यापनाचा आनंद हा चिरकाल टिकणारा असतो. शिक्षक दिन साजरा करणे व ऋण व्यक्त करणे हे आजच्या दिवसापुरते मर्यादित न ठेवता शिक्षकांप्रती कायम कृतज्ञता बाळगणे हाच आपला धर्म मानला पाहिजे, असे उद्गार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शेंद्रे येथील अजिंक्यतारा सुतगिरणीचे संचालक अजित साळुंखे यांनी काढले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागातर्फे आयोजित डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंतीनिमित्त शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.



**नागठाणे : कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना अजित साळुंखे.**

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव होते.

अजित साळुंखे पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या विविध प्रकारच्या समस्या जाणून घेण्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये मित्रत्वाचे नाते असले पाहिजे आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजेत.

याप्रसंगी प्राध्यापकांतर्फे सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. संतोष निलाखे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी शिक्षकांतर्फे विद्यार्थी प्राचार्य सलीम शेख, तेजस्वी कांबळे, शिवांजली जाधव, साक्षी भोसले, स्नेहल सोनवले इत्यादी विद्यार्थी शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. बी. ए. आणि बी. कॉमच्या एकूण ३५ विद्यार्थ्यांनी शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भूमिका बजावली.

पाहुण्यांची ओळख प्राचार्य सलीम शेख यांनी सूत्रसंचालन अक्षय शिंदे पन्हाळकर यांनी तर आभार अक्षदा जाधव हिने मानले.

### सर्व गुणसंपन्न असावा

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव म्हणाले, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था ही शिक्षकांची संस्था असून या संस्थेतील शिक्षक हा अभ्यासू, व्यासंगी, चिंतनशील, संयमी, विद्यार्थी प्रिय इत्यादी गुणांनी सर्व गुणसंपन्न असावा. नागठाणे महाविद्यालयाने नॅकमध्ये मिळविलेल्या यशावरून गुरुदेव कार्यकर्त्यांचे सर्वच पातळीवरील योगदान दिसून येते.

# शिक्षकांबद्दल कायम कृतज्ञता हाच आपला धर्म... अजित साळुंखे

सातारा न्यूज;

देशमुखनगर(सतिश जाधव): शिक्षक होण्याचा अनुभव हा अतिशय सुखद असून अध्यापनाचा आनंद हा चिरकाल टिकणारा असतो. शिक्षक दिन साजरा करणे व ऋण व्यक्त करणे हे आजच्या दिवसापुरते मर्यादित न ठेवता शिक्षकांप्रती कायम कृतज्ञता बाळगणे हाच आपला धर्म मानला पाहिजे.

असे उद्गार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शेंद्रे येथील अजिंक्यतारा सूतगिरणीचे संचालक अजित साळुंखे यांनी काढले.



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज,नागठाणे महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती निमित्त शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिलकुमार जाधव हे होते.

अजित साळुंखे आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या विविध प्रकारच्या समस्या जाणून घेण्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये मित्रत्वाचे नाते असले पाहिजे आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजेत.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिलकुमार जाधव आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था ही शिक्षकांची संस्था असून या संस्थेतील शिक्षक हा अभ्यासू , व्यासंगी, चिंतनशील,संयमी, विद्यार्थी प्रिय इत्यादी गुणांनी सर्व गुण संपन्न असावा. नागठाणे महाविद्यालयाने नॅकमध्ये मिळविलेल्या यशावरून गुरुदेव कार्यकर्त्यांचे सर्वोच्च पातळीवरील योगदान दिसून येते. शिक्षक ही सेवा नसून ते एक व्रत आहे. ते व्रत आयुष्यभर प्रामाणिकपणे पाळले पाहिजे.

याप्रसंगी प्राध्यापकांच्या वतीने सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.संतोष निलाखे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी शिक्षकांच्या वतीने विद्यार्थी प्राचार्य सलीम शेख, कु.तेजस्वी कांबळे कु.शिवांजली जाधव कु.साक्षी भोसले,कु.स्नेहल सोनवले इत्यादी विद्यार्थी शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. बी.ए. आणि बी.कॉमच्या एकूण ३५ विद्यार्थ्यांनी शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भूमिका बजावली. या शिक्षक दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अजित साळुंखे यांनी महाविद्यालयाला विज्ञान शाखेसाठी एकूण ५००० रुपयाची देणगी दिली व भविष्यात महाविद्यालयाला काही समस्या असतील तर मदतीचे आवाहनही केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत पाहुण्यांची ओळख विद्यार्थी प्राचार्य सलीम शेख यांनी सूत्रसंचालन अक्षय शिंदे कु.पन्हाळकर यांनी तर आभार कु.अक्षदा जाधव हिने मानले.

महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक,विद्यार्थी-विद्यार्थिनी,सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर बहुसंख्येने उपस्थित होते.

# नागठाणे महाविद्यालयाला विज्ञान शाखेची परवानगी

**नागठाणे :** नुकतेच नेक नामांकन मिळालेल्या नागठाणे(ता.सातारा) येथील कला, वाणिज्य महाविद्यालयाला विज्ञान शाखा सुरू करण्याची परवानगी महाराष्ट्र शासनाने दिल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील यांनी दिली. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन आदेश क्र.एन.जि.सी.२०२२/(११६/२२)/मशि.४ दि. १६ ऑगस्ट २०२२ च्या आदेशानुसार सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षांपासून विज्ञान भाग-१ या सुरू करण्याची मान्यता मिळाली आहे. यामुळे नागठाणे परिसरातील विद्यार्थ्यांना नागठाणे येथे विज्ञान शाखेत प्रवेश घेता येईल.



# प्राचार्य डॉ.जे.एस.पाटील यांच्याकडून दोन लाख रुपये देणगी

**नागठाणे/प्रतिनिधी:**

श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्ट्स अण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.एस.पाटील यांनी नागठाणे व शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालयांना एक –एक लाख रुपये असे दोन लाख रुपये संस्थात्मक शिष्यवृत्तीसाठी कायम मुदत ठेव म्हणून दोन्ही महाविद्यालयाना दिले आहेत

सदर शिष्यवृत्ती ही दोन्ही महाविद्यालयातील बी.ए.व बी.कॉम.भाग–१,२ व ३ या वर्गामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना एकूण सहा पारितोषिके २ लाख रूपये ठेवीच्या व्याजाच्या मिळणाऱ्या रक्मेतून देण्यात येणार आहेत. बी.ए व बी.कॉम.भाग १ करिता शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे पारितोषिक,

बी.ए बी.कॉम भाग –२ करिता संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे पारितोषिक, बी.ए व बी.कॉम भाग –३ करिता श्री स्वामी विवेकानंद पारितोषिक इत्यादींच्या नावे ही पारितोषिके देण्यात येणार आहेत. या अगोदर नागठाणे महाविद्यालयास प्राचार्य, प्राध्यापक, ग्रामस्थ व माजी विद्यार्थी यांनी शिष्यवृत्तीच्या स्वरूपात देणगी दिलेली २ लाख १२ हजार रुपये रक्कम ठेवीच्या स्वरूपात बँकमध्ये ठेवली आहे.त्यामध्ये आता या एक लाख रकमेची भर पडली असून ती आता ३ लाख १२ हजार रुपये इतकी झालेली आहे.ही संस्थात्मक शिष्यवृत्ती बापूजींच्या स्वप्नातील विद्यार्थी घडविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. या शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहन व प्रेरणा मिळत असते. या संस्थात्मक शिष्यवृत्तीच्या उपक्रमामुळे शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दिली जाणारी गुणवत्ता शिष्यवृत्ती महाविद्यालयाच्या ९ विद्यार्थ्यांना मिळालेली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती मध्ये नागठाणे महाविद्यालयाने ग्रामीण भागामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले आहे. सदर शिष्यवृत्तीच्या योजनेमुळे महाविद्यालय विद्यापीठाच्या विविध शिष्यवृत्ती प्राप्त करून यशस्वी वाटचाल करीत आहे. हा स्तुत्य उपक्रम विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा देणार आहे. भविष्यकाळामध्ये या उपक्रमामुळे महाविद्यालयाच्या गुणवत्तेचा दर्जा सातत्याने वाढतच राहील याचा आम्हा सर्वांना दृढ आत्मविश्वास वाटतो.

ही रक्कम सुपूर्द करताना प्राध्यापक, ग्रामस्थ, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# प्रीतिसंगम

www.pritisangam.com सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

शुक्रवार | दिनांकः २९ जुलै २०२२ | किंमत २ रुपये | R.N.I.No.M | पोस्ट परवाना N


# नागठाणे कॉलेजला नॅकचे A+ मानांकन

**नागठाणे/प्रतिनिधी:**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्टस् एड कॉमर्स कॉलेज नागठाणेचे राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, बेंगलोर (N--C) कडून A+(CGP--3.42) हे मानांकन मिळाले आहे. नागठाणे महाविद्यालय हे शिवाजी विद्यापीठ परीक्षेत्रातील ग्रामीण विभागातील उच्च दर्जाची गुणवत्ता प्राप्त करणारे व विद्यार्थीकेंद्रित, समाजकेंद्रित विविध उपक्रम राबविणारे महाविद्यालय आहे. महाराष्ट्रमधील ग्रामीण व डोंगरी भागातील महाविद्यालयामध्ये A+(CGP--3.42) इतके मानांकन मिळविणारे हे दुर्मिळ महाविद्यालय आहे.



महाविद्यालयास परिषदेने नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने दि. १८ व १९ जुलै, २०२२ रोजी भेट दिली होती.या समितीचे चेअरमन म्हणून राजस्थान विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. (डॉ)राजीव जैन, समन्वयक सदस्य म्हणून ओडिशाच्या बेरहमपुर विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे माजी प्रो.(डॉ)जुगल किशोर मिश्रा तर सदस्य म्हणून गुजरातच्या आनंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश गढवी होते.सदर समितीने महाविद्यालयाचे प्राचार्य, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक, क्रायटेरियन प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संस्था पदाधिकारी, शासनाचे व विद्यापीठाचे प्रतिनिधी, आजी आणि माजी विद्यार्थी, पालक, इ. घटकांशी संवाद साधला होता व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, जिमखाना, ग्रंथालय, संगणक प्रयोगशाळा,रेन वॉटर हार्वेस्टिंग, सोलर सिस्टीम इत्यादी विविध विभागांना भेटी देऊन महाविद्यालयाने राबविलेल्या उपक्रमांची माहिती घेतली होती.तसेच महाविद्यालयाने बेस्ट प्रॅक्टिस म्हणून राबविलेल्या नागठाणे स्मशानभूमी स्वच्छता, वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन या उपक्रमाची पाहणी करून विद्यार्थी व ग्रामस्थांशी संवाद साधला होता.

महाविद्यालयाच्या या यशामध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे माजी अधिष्ठाता (सामाजिक शास्त्रे विद्याशाखा) व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील, नॅक समितीचे समन्वयक प्रा.डॉ. सुरेश पाटील, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी प्राचार्य, माजी विद्यार्थी संघ,पालक,पंचक्रोशीतील ग्रामस्थ, पत्रकार, महाविद्यालयाशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध असणारे प्रत्येक घटकाच्या सहकार्याने हे उत्तुंग शिखर गाठता आले.

महाविद्यालयाने हे घवघवीत यश प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयातील सर्व घटकांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा सौ. शुभांगी गावडे, ,सहसचिव (प्रशासन) प्राचार्य राजेंद्र शेजवळ,सहसचिव (अर्थ) प्राचार्य एस.एम. गवळी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ.हेमंत कठरे, माजी सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ.अशोक करांडे, प्राचार्य डॉ.शैलजा माने, प्राचार्य डॉ.सुभाष शेळके, सरपंच डॉ. रूपाली बेंद्रे, उपसरपंच श्री अनिल साळुंखे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, महाविद्यालय विकास समिती चे सदस्य श्री यशवंत हरी साळुंखे (नाना), कृषिभूषण श्री मनोहर साळुंखे,माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री गणेश साळुंखे, विकास सेवा सोसायटीचे माजी चेअरमन श्री संजय साळुंखे (दादा), श्री मधुकर खुळे,श्री बाळासाहेब पवार, प्राचार्य सुहास साळुंखे,प्र प्राचार्य डॉ महेश गायकवाड, प्राचार्य श्री संजय नलवडे, ग्रामस्थ तसेच समाजातील शैक्षणिक, सामाजिक इ. क्षेत्रातील विविध घटकांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

# प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील यांच्याकडून दोन लाखांची देणगी



नागठाणे : देणगीचा धनादेश देताना प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील.

प्रतिनिधी
नागठाणे

श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे (ता. सातारा) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील यांनी नागठाणे व कराड येथील शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालयांना एक–एक लाख रुपये असे दोन लाख रुपये संस्थात्मक शिष्यवृत्तीसाठी कायम मुदत ठेव म्हणून नुकतेच दिले आहेत.

सदर शिष्यवृत्ती ही दोन्ही महाविद्यालयातील बी. ए. व बी. कॉम. भाग–१, २ व ३ या वर्गामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना २ लाख रूपये ठेवीच्या व्याजाच्या मिळणाऱ्या रक्कमेतून देण्यात येणार आहेत. बी. ए व बी. कॉम. भाग १ करिता शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे पारितोषिक, बी. ए बी. कॉम भाग –२ करिता संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे पारितोषिक, बी.ए व बी. कॉम भाग –३ करिता श्री स्वामी विवेकानंद पारितोषिक इत्यादींच्या नावे ही पारितोषिके देण्यात येणार आहेत.

ही संस्थात्मक शिष्यवृत्ती बापूजींच्या स्वप्नातील विद्यार्थी घडविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये नागठाणे महाविद्यालयाने ग्रामीण भागामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले आहे. हा स्तुत्य उपक्रम विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा देणार आहे. ही रक्कम सुपूर्द करताना प्राध्यापक, ग्रामस्थ, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारा स्तुत्य उपक्रम : गावडे




नागठाणेः उद्बोधन वर्गास संबोधित करताना कौस्तुभ गावडे.

प्रतिनिधी
नागठाणे

विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर काळाची गरज लक्षात घेऊन विविध प्रकारची कला-कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे. सदर विद्यार्थी उद्बोधन वर्ग हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण सुप्त कलागुणांना वाव देणारा स्तुत्य उपक्रम आहे, असे उद्गार विद्यार्थी उद्बोधन वर्गाचे प्रमुख उद्घाटक स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी काढले.

नागठाणे (ता.सातारा) येथील आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज महाविद्यालयात सात दिवसीय विद्यार्थी उद्बोधन वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा. अभय जायभाये तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजितकुमार जाधव म्हणाले, विद्यार्थ्यांनी भविष्य उज्वल करण्यासाठी विविध कलागुण व कौशल्ये आत्मसात करावीत. सदर ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक विद्यार्थी उद्बोधन वर्गाचे समन्वयक प्रा. दीपक गुरव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. आर. एम. कांबळे यांनी तर आभार गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. सुरेश पाटील यांनी मानले. सदर कार्यक्रमाचे संयोजन प्रा. अशोक गाडेकर व त्यांच्या सदस्यांनी केले.

## राष्ट्र उभारणीमध्ये युवकांची भूमिका महत्त्वाची

प्रा. अभय जायभाये म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना ही तरुणांसाठी एक संस्कार पीठ आहे. त्यातूनच खऱ्या अर्थाने राष्ट्राची उभारणी होत असते. राष्ट्र उभारणीमध्ये युवकांची भूमिका महत्वाची असून विद्यार्थ्यांनी स्वावलंबन, शांतता, संयम, नम्रता, परिश्रम, समाजशीलता इत्यादी गुण आत्मसात करणे गरजेचे आहे. आपला देश हा तरुणांचा देश असल्याचे त्यांनी सांगितले.

# प्रा. राजाराम कांबळे यांना शिवाजी विद्यापीठाची पीएचडी पदवी

**सातारा/प्रतिनिधी:** श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्टस अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागप्रमुख राजाराम कांबळे यांनी शिवाजी विद्यापीठाची अर्थशास्त्र विषयातील पीएचडी पदवी प्राप्त केली. त्यांच्या संशोधनाचा विषय Finances of Mahabaleshwar and Panchgani Municipal Councils: 2003 to 2013 हा होता. त्यांनी प्रो. डॉ. जयवंत इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे संशोधन केले आहे.त्यांना मिळालेल्या या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे , संस्था सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे , संस्था सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री कौस्तुभ गावडे, माजी सहसचिव प्राचार्य डॉ. अशोक करांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील, प्राचार्य डॉ. अरूण गाडे व सर्व गुरूदेव कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले आहे.



प्रा. राजाराम कांबळे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना डॉ.अभयकुमार साळुंखे.(छाया-अनिल वीर)

प्रीतिसंगम

www.pritisangam.com सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापू

सोमवार | दिनांक: २२ ऑगस्ट २०२२ | किंमत २ रूपये | R.N.I.No. पोस्ट परवाना

# नागठाणे महाविद्यालयात विज्ञान विद्याशाखेतून पदवी घेण्याची सोय

**नागठाणे/प्रतिनिधी:**

श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयात सन २०२२-२३ या चालू शैक्षणिक वर्षात शासनाने विज्ञान विद्याशाखा सुरू करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे विज्ञान विद्याशाखेतून पदवी घेऊ इच्छिणाऱ्या नागठाणे परिसरातील विद्यार्थी विद्यार्थिनींची सोय झाली आहे .

नागठाणे महाविद्यालयाची स्थापना सन २००० मध्ये झाली. या महाविद्यालयात आर्ट्स अँड कॉमर्समधून पदवीचे शिक्षण देण्याची सोय झाली मात्र विज्ञान विद्याशाखेतून पदवी घेण्याची सोय नव्हती . सुरुवातीपासूनच विज्ञान विद्याशाखा सुरु करावी यासाठी स्थानिक ग्रामस्थांची मागणी होती . या परिसरातील विद्यार्थ्यांना विज्ञान विद्याशाखेतून पदवी घेण्यासाठी सातारा आणि कराड येथे जावे लागत होते ते गैरसोयीचे असल्याने इच्छा असूनही काही विद्यार्थी विज्ञान विद्या शाखेची पदवी घेऊ शकत नव्हती .

नागठाणे महाविद्यालयात येणारे विद्यार्थी हे परिसरातील ५५ खेड्यातून , डोंगरदऱ्या खोऱ्यातून येतात. विज्ञान विद्याशाखा सुरू झाल्यामुळे या विद्यार्थ्यांचे विज्ञान विद्याशाखेतून पदवी घेण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे .त्यामुळे परिसरातील ग्रामस्थ विद्यार्थी पालक यांनी समाधान व्यक्त केली आहे.

सन २०२२-२३ या चालू शैक्षणिक वर्षात बी एस्सी- भाग एक मध्ये प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे . तरी नागठाणे परिसरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी बी एस्सी - भाग एक मध्ये प्रवेश घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.एस. पाटील यांनी केली आहे.

# नागठाणे कॉलेजला नॅकचे A+ मानांकन

प्रतिनिधी
नागठाणे

येथील (ता.सातारा) आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेजला राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, बेंगलोर (NAAC) कडून A+(CGPA-3.42) हे मानांकन मिळाले आहे. नागठाणे महाविद्यालय हे शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील ग्रामीण विभागातील उच्च दर्जाची गुणवत्ता प्राप्त करणारे व विद्यार्थीकेंद्रित, समाजकेंद्रित विविध उपक्रम राबविणारे महाविद्यालय आहे. महाराष्ट्रामधील ग्रामीण व डोंगरी भागातील महाविद्यालयामध्ये (CGPA-3.42) इतके मानांकन मिळविणारे हे दुर्मिळ महाविद्यालय आहे.

महाविद्यालयास परिषदेने नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने दि. १८ व १९ जुलै, २०२२ रोजी भेट दिली होती. या समितीचे चेअरमन म्हणून राजस्थान विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. राजीव जैन, समन्वयक सदस्य म्हणून ओडिशाच्या बेरहमपुर विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे माजी प्रो. डॉ. जुगल किशोर मिश्रा तर सदस्य म्हणून गुजरातच्या आनंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश गढवी होते. घवघवीत यश प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयातील सर्व घटकांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा शुभांगी गावडे, सहसचिव (प्रशासन) प्राचार्य राजेंद्र शेजवळ, सहसचिव (अर्थ) प्राचार्य एस. एम.गवळी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस्. पाटील, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. हेमंत कठरे, माजी सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. अशोक करांडे, प्राचार्य डॉ. शैलजा माने, प्राचार्य डॉ. सुभाष शेळके, सरपंच डॉ. रूपाली बेंद्रे आदींनी अभिनंदन केले.

# प्रा. गणेश गभाले यांना पुणे विद्यापीठाची पीएच.डी पदवी

***प्रतिनिधी/नागठाणे:***

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित आर्टस एण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे या महाविद्यालयातील हिंदी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक गणेश दुंदा गभाले यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची हिंदी विषयातील पीएच. डी पदवी प्राप्त केली. त्यांच्या संशोधनाचा विषय स्वातंत्र्योत्तर प्रतिनिधिक व्यंग्यात्मक निबंध साहित्य का अनुशीलन हा होता. त्यांनी प्रा.डॉ. सचिन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हे संशोधन केले.



त्यांना मिळालेल्या या यशाबददल श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ.राजेंद्र शेजवळ, सहसचिव (अर्थ) प्राचार्य एस. एम. गवळी, संस्थेचे माजी सहसचिव प्राचार्य डॉ. अशोक करांडे, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. जे. एस.पाटील, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजितकुमार जाधव, व सर्व गुरूदेव कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



# नागठाणे कॉलेजला नॅकचे ए प्लस मानांकन

**नागठाणे,दि.२९(प्रतिनिधी)** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज नागठाणेचे राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, बेंगलोर (NAAC) कडून **A+(CGP--3.42)** हे मानांकन मिळाले आहे. नागठाणे महाविद्यालय हे शिवाजी विद्यापीठ परीक्षेत्रातील ग्रामीण विभागातील उच्च दर्जाची गुणवत्ता प्राप्त करणारे व विद्यार्थीकेंद्रित,समाजकेंद्रित विविध उपक्रम राबविणारे महाविद्यालय आहे. महाराष्ट्रामधील ग्रामीण व डोंगरी भागातील महाविद्यालयामध्ये **A+(CGP--3.42)** इतके मानांकन मिळविणारे हे दुर्मिळ महाविद्यालय आहे.

महाविद्यालयास परिषदेने नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने दि. १८ व १९ जुलै,२०२२ रोजी भेट दिली होती.या समितीचे चेअरमन म्हणून राजस्थान विद्यापीठाचे कुलगुरू प्रो.(डॉ)राजीव जैन, समन्वयक सदस्य म्हणून ओडिशाच्या बेरहमपुर विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे माजी प्रो.(डॉ)जुगल किशोर मिश्रा तर सदस्य म्हणून गुजरातच्या आनंद कॉलेजचे प्राचार्य डॉ.सुरेश गढवी होते.सदर समितीने महाविद्यालयाचे प्राचार्य, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक, क्रायटेरियन प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संस्था पदाधिकारी,शासनाचे व विद्यापीठाचे प्रतिनिधी,आजी आणि माजी विद्यार्थी, पालक, इ.घटकांशी संवाद साधला होता व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, जिमखाना, ग्रंथालय, संगणक प्रयोगशाळा,रेन वॉटर हार्वेस्टिंग,सोलर सिस्टीम इत्यादी विविध विभागांना भेटी देऊन महाविद्यालयाने राबविलेल्या उपक्रमांची माहिती घेतली होती.तसेच महाविद्यालयाने बेस्ट प्रॅक्टिस म्हणून राबविलेल्या नागठाणे स्मशानभूमी स्वच्छता,वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन या उपक्रमाची पाहणी करून विद्यार्थी व ग्रामस्थांशी संवाद साधला होता.

महाविद्यालयाच्या या यशामध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे पदाधिकारी,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे माजी अधिष्ठाता (सामाजिक शास्त्रे विद्याशाखा) व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.एस.पाटील, नॅक समितीचे समन्वयक प्रा.डॉ.सुरेश पाटील, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी प्राचार्य, माजी विद्यार्थी संघ,पालक,पंचक्रोशीतील ग्रामस्थ,पत्रकार,महाविद्यालयाशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध असणारे प्रत्येक घटकाच्या सहकार्याने हे उत्तुंग शिखर गाठता आले.

महाविद्यालयाने हे धवधवीत यश प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयातील सर्व घटकांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा सौ. शुभांगी गावडे,, सहसचिव (प्रशासन) प्राचार्य राजेंद्र शेजवळ,सहसचिव (अर्थ) प्राचार्य एस.एम.गवळी, कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.जे.एफ.पाटील, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ.हेमंत कठरे,माजी सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ.अशोक करांडे, प्राचार्य डॉ.शैलजा माने, प्राचार्य डॉ.सुभाष शेळके, सरपंच डॉ.रूपाली बेंद्रे,



उपसरपंच अनिल साळुंखे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, महाविद्यालय विकास समिती चे सदस्य यशवंत हरी साळुंखे (नाना), कृषिभूषण मनोहर साळुंखे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री गणेश साळुंखे, विकास सेवा सोसायटीचे माजी चेअरमन संजय साळुंखे (दादा),मधुकर खुळे, बाळासाहेब पवार, प्राचार्य सुहास साळुंखे,प्र प्राचार्य डॉ.महेश गायकवाड, प्राचार्य संजय नलवडे, ग्रामस्थ तसेच समाजातील शैक्षणिक, सामाजिक इ. क्षेत्रातील विविध घटकांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

# नागठाणे कॉलेजला 'ए प्लस' मानांकन

**नागठाणे, दि. ३१ (प्रतिनिधी)** - श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या नागठाणे येथील आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेजला राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, बेंगलोर (नॅक) यांच्याकडून 'ए प्लस' हे मानांकन मिळाले आहे. नागठाणे महाविद्यालय हे शिवाजी विद्यापीठ परीक्षेत्रातील ग्रामीण विभागातील उच्च दर्जाची गुणवत्ता प्राप्त करणारे व विद्यार्थीकेंद्रित, समाजकेंद्रित विविध उपक्रम राबविणारे महाविद्यालय आहे.

महाविद्यालयास परिषदेने नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने दि. १८ व १९ जुलै २०२२ रोजी भेट दिली होती. या समितीचे चेअरमन म्हणून राजस्थान विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजीव जैन, समन्वयक सदस्य म्हणून ओडिशाच्या बेरहमपूर विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे माजी प्रा. डॉ. जुगल किशोर मिश्रा तर सदस्य म्हणून गुजरातच्या आनंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश गढवी होते.सदर समितीने महाविद्यालयाचे प्राचार्य, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक, क्रायटेरियन प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संस्था पदाधिकारी, शासनाचे व विद्यापीठाचे प्रतिनिधी, आजी आणि माजी विद्यार्थी, पालक, इ. घटकांशी संवाद साधला होता व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, जिमखाना, ग्रंथालय, संगणक प्रयोगशाळा, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सोलर सिस्टीम इत्यादी विविध विभागांना भेटी देऊन महाविद्यालयाने राबविलेल्या उपक्रमांची माहिती घेतली होती. तसेच महाविद्यालयाने बेस्ट प्रॅक्टिस म्हणून राबविलेल्या नागठाणे स्मशानभूमी स्वच्छता, वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन या उपक्रमाची पाहणी करून विद्यार्थी व ग्रामस्थांशी संवाद साधला होता.

# प्रीतिसंगम

www.pritisangam.com सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

बुधवार | दिनांक: ६ जुलै २०२२ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MA | पोस्ट परवाना No


## राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने नागठाणे गावच्या स्मशानभूमी परिसरात वृक्षारोपण

**नागठाणे/प्रतिनिधी:**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्टस् एंड कॉमर्स कॉलेज,नागठाणे महाविद्यालयामधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध प्रकारच्या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.नागठाणे गावची स्मशानभूमी ही महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने स्वच्छतेसाठी व वृक्ष संवर्धनासाठी दत्तक घेतली असून प्रत्येक महिन्यातून दोन वेळा राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी स्मशानभूमीची स्वच्छता व वृक्षांची देखभाल करीत असतात. महाविद्यालयाच्या या स्तुत्य उपक्रमास नागठाणे ग्रामपंचायत व ग्रामस्थांचे सातत्याने सहभाग व सहकार्य असते.



याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील, सरपंच डॉ.सौ.रूपाली बेंद्रे, उपसरपंच अनिल साळुंखे, सदस्य हणमंत साळुंखे, कृषिभूषण मनोहर साळुंखे, संजय साळुंखे, मधुकर(अण्णा) खुळे, संभाजी जाधव, शिवाजी विद्यापीठ रा.से.यो. संचालक प्रा. अभय जायभाये, पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री.सतीश जाधव, पत्रकार संभाजी चव्हाण, शरद पवार, नितीन साळुंखे, पांडुरंग पवार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. संदिप लोखंडे, प्रा.गणेश गभाले, सदस्य, स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.

# नागठाणे कॉलेजमध्ये माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**नागठाणे, दि. ४ (प्रतिनिधी)** - नागठाणे येथील आर्टस्‌ अँण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये माजी विद्यार्थी संघाच्यावतीने आयोजित करण्यात आलेला माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नॅक समितीचे समन्वयक प्रा. डॉ. सुरेश पाटील व वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. संदीप लोखंडे तर प्रमुख उपस्थित म्हणून अजिंक्यतारा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य संजय नलवडे व कृषीभूषण मनोहर (भाऊ) साळुंखे हे होते. अध्यक्षस्थानी माजी अधिष्ठाता सामाजिक शास्त्रे विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील हे होते.डॉ. पाटील म्हणाले की, माजी विद्यार्थी हे महाविद्यालयाचे वैभव आहे. तसेच माजी विद्यार्थ्यांनी नॅक मूल्यांकन प्रक्रियेला सामोरे जाताना समितीबरोबर महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासाबाबत सहजपणे संवाद साधणे गरजेचे आहे. त्याचबरोबर नॅक समिती ही माजी विद्यार्थ्यांबरोबर कशाप्रकारे संवाद साधते यासंदर्भात त्यांनी साध्या सोप्या भाषेत बारकावे सांगितले. प्रा. संदीप लोखंडे म्हणाले, विविध क्षेत्रातील माजी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या सर्वांगिण विकासामध्ये महत्त्वाचे योगदान आहे. हा महाविद्यालयाचा उंचावलेला आलेख मांडताना माजी विद्यार्थ्यांनी नॅक समितीला आत्मविश्वासाने सामोरे गेले पाहिजे. यावेळी मा. प्राचार्य संजय नलावडे, प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील, कृषीभूषण मनोहर (भाऊ) साळुंखे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष गणेश साळुंखे, रणधीर शिलेवंत, प्रदीप बर्गे, नागेश चव्हाण इत्यादींनी मनोगत व्यक्त केली. प्रास्ताविक व स्वागत प्रा. डॉ. अजितकुमार जाधव यांनी, आभार प्रा. एन. एम. चोबे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. एस. के. आतार यांनी केले. मेळाव्यास माजी विद्यार्थी संघाचे पदाधिकारी व सदस्य विक्रम बागल, प्रदीप साळुंखे, पद्मा ढाणे, महाविद्यालयाचे सर्व विभागातील माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.



**नागठाणे :** माजी विद्यार्थी मेळाव्यात बोलताना प्रा. डॉ. सुरेश पाटील, समवेत इतर.

# नागठाणे महाविद्यालयातर्फे स्मशानभूमी परिसरात वृक्षारोपण

प्रतिनिधी
नागठाणे

नागठाणे (ता.सातारा ) येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज महाविद्यालयामधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध प्रकारच्या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. येथील स्मशानभूमी परिसरात यावेळी सुमारे ४० रोपांची लागवड करण्यात आली.

नागठाणे गावची स्मशानभूमी ही महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने स्वच्छतेसाठी व वृक्ष संवर्धनासाठी दत्तक घेतली असून प्रत्येक महिन्यातून दोन वेळा राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी स्मशानभूमीची स्वच्छता व वृक्षांची देखभाल करीत असतात. महाविद्यालयाच्या या स्तुत्य उपक्रमास नागठाणे ग्रामपंचायत व ग्रामस्थांचे सातत्याने सहभाग व सहकार्य असते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील, सरपंच डॉ. सौ. रूपाली बेंद्रे, उपसरपंच अनिल साळुंखे, सदस्य हणमंत साळुंखे, कृषिभूषण मनोहर साळुंखे, संजय साळुंखे, समाजसेवक मधुकर खुळे, संभाजी जाधव, शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना संचालक प्रा. अभय जायभाये, पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष सतीश जाधव, पत्रकार संभाजी चव्हाण, नितीन साळुंखे, पांडुरंग पवार, शरद पवार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.संदीप लोखंडे, प्रा.गणेश गभाले, स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.



नागठाणे : स्मशानभूमीत वृक्षारोपण करताना प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील. समवेत पत्रकार संघाचे सदस्य संभाजी चव्हाण, सतीश जाधव, नितीन साळुंखे, पांडुरंग पवार व इतर.

# प्रीतिसंगम

www.pritisangam.com सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

सोमवार | दिनांक: ४ जुलै २०२२ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MA
पोस्ट परवाना No

## नागठाणे कॉलेजमध्ये माजी विद्यार्थी मेळावा संपन्न

**नागठाणे/प्रतिनिधी:**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,कोल्हापूर संचलित आर्टस् एंड कॉमर्स कॉलेज,नागठाणे महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी संघाच्या वतीने आयोजित माजी विद्यार्थी मेळावा संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नॅक समितीचे समन्वयक प्रा.डॉ.सुरेश पाटील व वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.संदीप लोखंडे तर प्रमुख उपस्थित म्हणून अजिंक्यतारा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य मा. संजय नलवडे व कृषीभूषण मनोहर (भाऊ) साळुंखे हे होते.



अध्यक्षस्थानी माजी अधिष्ठाता सामाजिक शास्त्रे विभाग शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.एस.पाटील हे होते.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. पाटील म्हणाले की,माजी विद्यार्थी हे महाविद्यालयाचे वैभव आहे.तसेच माजी विद्यार्थ्यांनी नॅक मूल्यांकन प्रक्रियेला सामोरे जाताना समितीबरोबर महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासाबाबत सहजपणे संवाद साधणे गरजेचे आहे. त्याचबरोबर नॅक समिती ही माजी विद्यार्थ्यांबरोबर कशाप्रकारे संवाद साधते यासंदर्भात त्यांनी सोप्या भाषेत बारकावे सांगितले. कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख पाहुणे प्रा.संदीप लोखंडे म्हणाले की,विविध क्षेत्रातील माजी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासामध्ये महत्त्वाचे योगदान आहे. हा महाविद्यालयाचा उंचावलेला आलेख मांडताना माजी विद्यार्थ्यांनी नॅक समितीला आत्मविश्वासाने सामोरे गेले पाहिजे.

प्रमुख उपस्थित मा. प्राचार्य संजय नलावडे म्हणाले की, महाविद्यालयाचा सर्वांगीण विकास हा गौरवास्पद असून आजी विद्यार्थ्यांना घडविण्यामध्ये माजी विद्यार्थ्यांनी मोलाचा वाटा उचलला पाहिजे.तसेच नॅक समिती बरोबर संवाद साधताना प्रत्येकाने आपली भूमिका चोखपणे बजावली पाहिजे. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.एस.पाटील म्हणाले की, नागठाणे हे ग्रामीण भागातील उच्च दर्जाच्या गुणवत्तेचे महाविद्यालय आहे. गुणवत्तेचा आलेख अधिकाधिक उंचावण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचा अधिकाधिक सक्रिय सहभाग आवश्यक आहे. तसेच १८ जुलै,२०२२ रोजी नॅक समिती माजी विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधणार असून त्या दिवशी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून मोलाची भूमिका बजावावी असे आवाहनही त्यांनी केले. सदर कार्यक्रमाप्रसंगी कृषीभूषण मनोहर (भाऊ) साळुंखे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष गणेश साळुंखे, रणधीर शिलेवंत, प्रदीप बर्गे, नागेश चव्हाण इत्यादींनी मनोगत व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत पाहुण्यांची ओळख माजी विद्यार्थी संघाचे समन्वयक प्रा.डॉ.अजितकुमार जाधव यांनी आभार प्रा.एन.एम.चोबे यांनी मानले. तर सूत्रसंचालन प्रा.एस.के.आतार यांनी केले.

याप्रसंगी मेळाव्यास माजी विद्यार्थी संघाचे पदाधिकारी व सदस्य विक्रम बागल,प्रदीप साळुंखे, पद्मा ढाणे, महाविद्यालयाचे सर्व विभागातील माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

जनसामान्यांचा बुलंद आवाज

# कर्मयोगी

rmayogi ▮ मोबा.9326133731 सातारा-सांगली-कोल्हापूर-सोलापूर

:२९ RNI NO.MAH-MAR/2001/3806 / संपादिका:सौ.मंगल लोखंडे / प्रबंध संपादक:श्री.संजय पवार ▮मंगळवार दि.५ जुलै २०२२ ▮

ssue-29 RNI NO.MAH-MAR/2001/3806 /Editor Mrs.Mangal Lokhande/ ▮ Tuesday 5 Jully 2022 ▮ Pag



## नागठाणे कॉलेजमध्ये माजी विद्यार्थी मेळावा संपन्न



[illegible]